राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, पर्वरी–गोवा

# शिक्षक मार्गदर्शक (भाग २)

## पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम : बालवाटिका - २ (वयोगट ४ ते ५)



# शिक्षक मार्गदर्शक

(भाग २)

**पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम : बालवाटिका – २ (वयोगट ४ ते ५)**

# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम : बालवाटिका – २ (वयोगट ४ ते ५)

**विकासक्षेत्र : शारीरिक विकास (अन्नमय व प्राणमय कोश विकास)**

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

क्षमता : C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शविते व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | आहार | अन्नपदार्थ | १. मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदा. धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ इ. | १. मुलांना डब्यातून विविध पोषक अन्नपदार्थ देण्याविषयी पालक प्रबोधन करणे.<br>२. डब्यातून आणलेली वेगवेगळी फळे, धान्य व डाळींचे पदार्थ, शेंगा, सुकामेवा, दुधाचे पदार्थ मोठ्यांच्या मदतीने योग्य पद्धतीने खाणे.<br>३. डब्यातील अन्नपदार्थ खाण्यापूर्वी ते निर्माण करणाऱ्या व बनविणाऱ्या व्यक्तीप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा श्लोक किंवा प्रार्थना म्हणणे.<br>४. अन्नपदार्थांची चव, अन्नाचे महत्त्व यांविषयी मुलांशी गप्पागोष्टी करणे. | अन्नपदार्थ, श्लोक, प्रार्थना |
| बालवाटिका २ | आहार | पोषक आणि अपायकारक पदार्थ | २. दुकानातील आरोग्यास पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ स्पष्ट करतो. | १. दुकानातील आरोग्यास पोषक व अपायकारक अन्नपदार्थ वर्गात आणून मुलांना त्यांचा परिचय करून देणे. उदा. फळे, भाज्या, धान्ये, डाळी, शेंगा, सुकामेवा, दुधाचे पदार्थ, बिस्किट, वेफर्स, कुरकुरे, केक, आईस्क्रिम, चॉकलेट, नुडल्स, शीतपेये इत्यादी.<br>२. दुकानातील आरोग्यास पोषक व अपायकारक अन्नपदार्थांची चित्रकार्डे तयार करून पोषक पदार्थांना हिरवी पट्टी व अपायधारक पदार्थांना लाल पट्टी चिकटवणे. पट्ट्या खुर्च्यांवर मांडून संगीत खुर्ची, खेळ खेळणे.<br>३. आरोग्यास पोषक व अपायकारक अन्नपदार्थांची चित्रे व अंकांची मांडणी असलेला, मुलांना उभे राहता येईल असा, सापशिडीचा कापडी चौकोन तयार करून सापशिडीचा खेळ खेळणे.<br>४. वेगवेगळे अन्नपदार्थ किंवा त्यांच्या प्रतिकृती मांडून मुलांना आरोग्यास पोषक अन्नपदार्थ निवडण्यास सांगणे.<br>५. आरोग्यास पोषक असलेल्या अन्नपदार्थांची गाणी म्हणणे. | अन्नपदार्थ, प्रतिकृती, चित्रकार्डे खुर्च्या सापशिडीचा फलक अन्नपदार्थाच्या प्रतिकृती गाणी |
| बालवाटिका २ | आहार | पोषक अन्नपदार्थ | ३. काही पदार्थ पोषक असण्यामागची कारणे स्पष्ट करतो. | १. पोषक व अपायकारक अन्नपदार्थांविषयी मुलांशी चर्चा करणे.<br>२. अन्नपदार्थांची नावे व ते पोषक का असतात हे मुलांनी सांगणे.<br>३. पोषक व अपायकारक अन्नपदार्थांविषयी बोलक्या बाहुल्यांचे संभाषण.<br>४. पोषक पदार्थांची चित्रे हातात धरून मुलांनी त्याबद्दल एक-दोन वाक्ये बोलणे. | बोलक्या बाहुल्या, चित्रे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | आहार | अन्नपदार्थ निर्मिती | ४. चित्रकृतींच्या मदतीने सोपी न्याहरी बनविणे. | १. चित्रकृतीच्या मदतीने न्याहरी कशी बनविली जाते याची मुलांना प्रत्यक्ष माहिती देणे.<br>२. चित्रकृतींच्या मदतीने मुलांनी भेळ, शेंगदाण्यांचा लाडू, सँडविच यासारखे सोपे पदार्थ बनविणे.<br>३. चित्रकृतींच्या मदतीने न्याहरी कशी बनविली जाते याविषयीच्या चित्रफिती दाखवणे. | न्याहरीसाठी लागणारे पदार्थ, चित्रफिती, चित्रकृती |
| बालवाटिका २ | आहार | खाण्याची योग्य पद्धत | ५. अन्नपदार्थ न सांडता खातो. | १. अन्नपदार्थ न सांडता खाण्याविषयी मुलांना मार्गदर्शन करणे. (उदा. पदार्थ योग्य प्रमाणात व योग्य पद्धतीने हातांच्या बोटांनी धरणे, योग्य पद्धतीने तोंडात घास घेणे इ.)<br>२. मुलांनी अन्नपदार्थ न सांडता खाणे. | अन्नपदार्थ |

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.2 स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | स्वच्छता | हातांची स्वच्छता | १. शौचालयाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुणे आणि पुसणे या क्रिया स्वतःहून करण्यास सुरुवात करतो. | १. शौचालयातून आल्यावर मुलांना साबणाने हात स्वच्छ धुवून कोरडे करण्यास सांगणे.<br>२. जेवणापूर्वी व जेवणानंतर मुलांनी हात स्वच्छ धुणे व पुसणे.<br>३. हात स्वच्छ धुण्याचे महत्त्व मुलांना संभाषणातून सांगणे.<br>४. हात स्वच्छ धुण्याच्या क्रिया सांगणारे कृतियुक्त गीत म्हणणे. | साबण, पाणी, रुमाल, गाणे |
| बालवाटिका २ | चांगल्या सवयी | कपडे, चप्पल/ बूट घालणे | २. मदतीशिवाय स्वतः कपडे, चप्पल/ बूट घालतो. | १. मुलांना इतरांच्या मदतीशिवाय कपडे घालण्यास, बटणे लावण्यास सांगणे.<br>२. इतरांच्या मदतीशिवाय स्वतः चप्पल/ बूट घालण्याचा सराव करून घेणे. | चप्पल, बूट, कपडे |
| बालवाटिका २ | चांगल्या सवयी | स्वतःच्या वस्तूंचा वापर करणे | ३. स्वतःहून वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करतो. (कंगवा, ब्रश) | १. कंगवा, टूथब्रश, टूथपेस्ट, साबण, तेल, पावडर, आरसा या व इतर आवश्यक वस्तूंचा वापर कसा करावा यांविषयी मुलांना मार्गदर्शन करणे, चित्रफित दाखविणे व मुलांना त्या वापर करण्याचा सराव करून घेणे.<br>२. वस्तूंच्या वापराविषयी कृतियुक्त गाणे म्हणणे. | कंगवा, टूथब्रश, टूथपेस्ट, साबण, तेल, पावडर, आरसा, गाणे. |

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.3 शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटका ठेवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | चांगल्या सवयी | शिस्त, साहित्याची निगा | १. स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो. | १. नित्य वापराच्या वस्तू मुलांनी योग्य जागेवरून घेणे व वापरून झाल्यावर त्या पुन्हा योग्य जागी ठेवण्याविषयी मार्गदर्शन करणे.<br>२. मुलांनी आपला डबा, शाळेची बॅग, ताटल्या, पेले, क्रीडासाहित्य व इतर वस्तू योग्य जागेवरून घेणे आणि पुन्हा योग्य जागी ठेवणे. | डबा, शाळेची बॅग, ताटल्या, पेले, क्रीडासाहित्य, इतर वस्तू. |
| बालवाटिका २ | चांगल्या सवयी | स्वतःची कामे स्वतः करणे | २. स्वच्छ पेले, ताटल्या ओळखतो आणि वापरतो तसेच स्वतंत्रपणे अस्वच्छ (खरकटे) ताटल्या आणि भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो. | १. मुलांना स्वच्छ ताटल्या, भांडी, पेले, वाट्या वापरण्यास सांगणे.<br>२. प्रत्यक्ष भांडी दाखवून स्वच्छ भांडी कशी ओळखावीत हे सांगणे.<br>३. जेवल्यानंतर किंवा डाबा खाल्ल्यानंतर मुलांनी खरकटे योग्य भांड्यात टाकणे.<br>४. खरकटी भांडी, धुवायच्या जागी नेऊन ठेवणे. | डबा, ताटल्या, पेले, वाट्या, खरकटे टाकण्याचे भांडे. |
| बालवाटिका २ | स्वच्छता | कचरापेटीचा वापर | ३. कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करायला सुरुवात करतो. | १. मुलांचे लक्ष वेधून घेईल असा आकार, रंग व चित्र असलेल्या कचरापेटीची व्यवस्था करणे.<br>२. कचरापेटीत फळांची साले, कागदांचे तुकडे व इतर वस्तू कशा टाकायच्या असतात याचे मुलांना प्रात्यक्षिक दाखविणे.<br>३. मुलांना कचरापेटीत कचरा टाकण्याची सवय लावणे.<br>४. कचरा व स्वच्छतेसंबंधी बोलक्या बाहुल्यांचा संवाद.<br>५. कचरापेटीत कचरा टाकण्याची सूचना, तसेच स्वच्छतेचा संदेश देणारे चित्रमय फलक लावणे.<br>६. स्वच्छतेसंबंधी घोषणा देणे.<br>७. स्वच्छतेचा संदेश देणारे गीत म्हणणे. | कचरापेटी, बोलक्या बाहुल्या, फलक, घोषणा , गीत |

| ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>क्षमता : C-1.4 : वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करतो. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **स्तर/ इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** |
| बालवाटिका २ | सुरक्षितता | साहित्य हाताळणी | १. कात्री, सुरी, आगपेटी अशा धोकादायक आणि हानिकारक वस्तू काळजीपूर्वक हाताळतो. | १. मुलांनी कात्री, सुरी, आगपेटी यांसारख्या धोकादायक वस्तू काळजीपूर्वक व योग्य पद्धतीने कशा वापराव्यात हे समजावून सांगणे. मुलांना त्या वस्तू हाताळण्यास देणे.<br>२. धोकादायक वस्तू काळजीपूर्वक व योग्य पद्धतीने न हाताळल्यास होणाऱ्या परिणामांविषयीची चित्रफित मुलांना दाखविणे. | कात्री, सुरी, आगपेटी, नेलकटर |

| ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.<br>क्षमता : C-1.5 : हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्य रीतीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालवणे) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **स्तर/ इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** |
| बालवाटिका २ | सुरक्षितता | रस्ता सुरक्षितता | १. रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहतो, बरोबरच्या मुलांचे किंवा प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालतो. | १. रस्त्याने चालण्याविषयीच्या नियमांविषयीची चित्रफित दाखवणे.<br>२. रस्त्याने चालण्याविषयीचे नियम, योग्य पद्धती व सुरक्षितता याविषयांवर मुलांशी संभाषण करणे.<br>३. मैदानावर रेषेने रस्ता आखून मुलांनी रस्ता ओलांडताना, दोन्ही बाजूला पाहून, प्रौढांचे हात पकडून कसे चालावे याचे प्रात्यक्षिक घेणे.<br>४. मुलांना झेब्रा क्रॉसिंगचे चित्र दाखवून त्याची माहिती देणे. | चित्रफित, झेब्रा क्रॉसिंगचे चित्र |

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.6 : असुरक्षित, धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सुरक्षितता | स्व-सुरक्षा | १. परिचित आणि विश्वासू प्रौढांनी, विचारपूस केल्यास वाटणारी अस्वस्थता व्यक्त करतो. | १. शिक्षक व पालकांनी मुलांशी प्रेमाचे व विश्वासाचे नाते निर्माण करून त्यांना मन मोकळे करण्याची संधी देणे.<br>२. आपल्या मनातील अस्वस्थता, शाळेतील शिक्षिका किंवा घरातील पालक व इतर प्रौढ व्यक्ती यांच्याशीच व्यक्त करण्याबाबत मुलांना मार्गदर्शन करणे.<br>३. आपली अस्वस्थता मनात दाबून न ठेवता ती परिचित व्यक्तीजवळ व्यक्त करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देणे.<br>४. आपल्या मनातील अस्वस्थता, मनातील भावना अनोळखी व्यक्तींजवळ व्यक्त केल्यास कोणते परिणाम होऊ शकतात यांसंबंधीची चित्रफित दाखवून त्याविषयी मुलांशी संभाषण करणे.<br>५. अपरिचित व्यक्तीजवळ आपल्या मनातील भावना व्यक्त केल्याने निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांविषयीची गोष्ट सांगणे. | चित्रफित गोष्ट |
| बालवाटिका २ | सुरक्षितता | स्व-सुरक्षा | २. अपरिचित व्यक्तींकडून खेळणी, चॉकलेट, पैसे आणि इतर वस्तू स्वीकारत नाहीत. | १. अपरिचित व्यक्तींकडून खेळणी, चॉकलेट, पैसे आणि इतर वस्तू न स्वीकारण्याबाबत मुलांना मार्गदर्शन करणे.<br>२. अपरिचित व्यक्तींकडून वस्तू स्वीकारल्यास निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबतची चित्रफित दाखवून त्याविषयी मुलांशी संभाषण करणे.<br>३. पालकांसोबत न येणाऱ्या व वाहनांतून प्रवास करणाऱ्या मुलांना बोलते करून गप्पागोष्टींतून त्यांचे अनुभव जाणून घेणे.<br>४. शाळेत येताना व जाताना पालकांची सोबत नसणाऱ्या व वाहनांतून प्रवास करणाऱ्या मुलांनी प्रौढांशी व अपरिचित व्यक्तींशी वागताना कोणती काळजी घ्यावी यांसंबंधी मुलांना मार्गदर्शन करणे. | चित्रफित |

ध्येय : CG-2 : मुले ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.1 : आकार, रंग आणि त्यांच्या छटा यांच्यातील फरक ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | ज्ञानेंद्रिय विकास | रंग | १. मूळ प्राथमिक व द्वितीय श्रेणीच्या रंगामधील छटा यांतील फरक ओळखतो.<br>(उदा. फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा.) | १. मूळ प्राथमिक रंग व द्वितीय श्रेणीचे रंग प्रत्यक्ष दाखवून त्यांची नावे सांगून त्यातील फरक स्पष्ट करणे.<br>२. प्राथमिक व द्वितीय रंगांच्या चित्रपट्ट्यांमधून सांगितलेल्या रंगांची चित्रपट्टी निवडणे.<br>३. दोन प्राथमिक रंगांच्या मिश्रणातून कोणता द्वितीय रंग तयार होतो हे प्रत्यक्ष दाखविणे. (उदा. पिवळा+निळा= हिरवा)<br>४. प्राथमिक व द्वितीय रंगांमध्ये पांढरा रंग किंवा पाण्याचे प्रमाण कमी-अधिक करून रंगाच्या फिकट आणि इतर छटा तयार करून दाखविणे.<br>५. फिकट आणि गडद रंगांची चित्रे व वस्तू दाखवून रंगांमधील फरक ओळखण्यास सांगणे. | रंग, पाणी, चित्रपट्ट्या, विविध वस्तू |
| बालवाटिका २ | ज्ञानेंद्रिय विकास | आकार | २. लांबी, रुंदी, उंची या मितींच्या आधारावर वस्तूंचे गट करतो. | १. विविध आकारांच्या वस्तू दाखवून त्या आकारांचा परिचय करून देणे.<br>२. विविध आकारांच्या वस्तू दाखवून त्या आकारातील फरक ओळखण्यास सांगणे.<br>३. दिलेल्या वस्तूंचे आकाराच्या आधारे वर्गीकरण करून समान आकाराच्या वस्तू वेगवेगळ्या पात्रांत ठेवणे. (उदा. गोल, चौकोनी, त्रिकोणी इ.)<br>४. विविध आकारांचा संदर्भ असलेली गोष्ट सांगणे. | विविध आकारांच्या वस्तू, पात्रे, गोष्ट |

ध्येय : CG-2 : मुले ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.2 : चिन्हे आणि प्रतीके यांकरिता दृक्स्मृती (Visual memory) विकसित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | ज्ञानेंद्रिय विकास | दृक्स्मृती | १. समान रचना, परंतु भिन्न आकार व दिशा असणारी चिन्हे/ प्रतीके जोडतो.<br>उदा. X <---------> +<br>∞ <---------> 8 | १. कृतिपुस्तिकेत समान रचना, परंतु भिन्न आकार व दिशा असणारी चिन्हे/ प्रतीके देऊन त्यांच्या जोड्या जुळविण्यास सांगणे.<br>उदा. S <---------> ᔕ<br>∧ <---------> ∨ | कृतिपुस्तिका |

ध्येय : CG-2 : मुले ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.3 : आवाजातील चढ-उतार (आरोह-अवरोह) सूर-ताल-लय यांनुसार फरक ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | ज्ञानेंद्रिय विकास | आवाजातील चढ-उतार | १. पक्षी, प्राणी, वाद्ये आणि मानवी आवाज यांच्या आवाजाच्या पातळीमधील चढ-उतारातील फरक ओळखतो. | १. मोबाईलवरून मुलांना कावळा, चिमणी, पोपट, मोर, कोकिळा, कुत्रा, मांजर, गाय, म्हैस, बकरी यांसारख्या पक्ष्यांचे व प्राण्यांचे आवाज ऐकविणे व त्यांची नक्कल करण्यास सांगणे.<br>२. घुमट, तबला, ढोलक, संवादिनी, बासरी, टाळ, डफली, खंजिरी यांसारख्या वाद्यांच्या आवाजांची मुलांना ओळख करून देणे.<br>३. रस्त्यावरून जाणाऱ्या वस्तू विक्रेत्यांचे आवाज ऐकवणे. त्यांच्या आवाजातील चढ-उताराची ओळख करून देऊन त्यांची नक्कल करण्यास सांगणे.<br>४. वेशभूषा करून मुलांनी विविध वस्तू विक्रेत्यांच्या भूमिका सादर करणे.<br>५. गाण्यांच्या व घोषणांच्या माध्यमातून आवाजातील चढ-उताराची ओळख करून देणे. | मोबाईल, प्राण्यांचे व पक्ष्यांचे आवाज, विविध वाद्ये, वस्तू विक्रेत्यांचे आवाज, गाणी, घोषणा |
| बालवाटिका २ | ज्ञानेंद्रिय विकास | वादन, छेका-लय | २. तालबद्ध ठेक्यातील मंद व वेगवान लयीमध्ये फरक करतो. | १. मात्रा व लयीत बदल करून टाळ्या वाजविणे व मुलांना त्यांचे अनुकरण करण्यास सांगणे.<br>२. संथ, मध्य, द्रुत लयीत तालवाद्ये वाजवून दाखविणे.<br>३. एकच गीत वेगवेगळ्या लयीत म्हणणे.<br>४. तालवाद्यांच्या लयीप्रमाणे चालण्याच्या वेगात बदल करणे.<br>५. गाणे म्हणताना, त्या लयीत टाळ्या वाजविणे.<br>६. वाद्यांचा ठेका धरून बडबडगीत म्हणणे.<br>७. टाळ, झांज, डफली, खंजिरी, ढोलक यांसारखी वाद्ये वाजवून मुलांना मुक्त शारीरिक हालचाली करण्याची संधी देणे. | गीत, टाळ, झांज, डफली, खंजिरी, ढोलक |

ध्येय : CG-2 : मुले ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.4 : वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | ज्ञानेंद्रिय विकास | गंध ओळख | १. फूल, अत्तर, खाद्यपदार्थ यांच्या सुगंधामधील फरक ओळखतो. | १. वेगवेगळी फुले, फळे, पाने यांचा सुगंध व त्यांच्या सुगंधामधील फरक यांचा प्रत्यक्ष अनुभव देणे.<br>२. विविध अत्तरांच्या सुगंधाचा अनुभव देणे.<br>३. रोजच्या जेवणातील खाद्यपदार्थांच्या गंधाचा व त्यांच्या वेगळेपणाचा प्रत्यक्ष अनुभव देणे.<br>४. डोळ्याला रुमाल बांधून सुगंधावरून वस्तू ओळखण्याचा खेळ घेणे. | फुले, फळे, पाने, अत्तर, खाद्यपदार्थ, रुमाल. |
| बलवाटिका २ | ज्ञानेंद्रिय विकास | चव | २. वेगवेगळ्या प्रकारच्या खाद्यपदार्थांची चव व पोत (Texture) यांचा अनुभव देणे. | १. विविध खाद्यपदार्थांची नावे सांगून त्यांच्या चवीचा अनुभव देणे.<br>२. विविध खाद्यपदार्थांना हाताने स्पर्श करण्याची संधी देणे.<br>३. खाद्यपदार्थ आणि त्यांची चव यावर आधारित बोलक्या बाहुल्यांचा संवाद.<br>४. खाद्यपदार्थांची चित्रे हातात धरून, एक-दोन वाक्यांसह त्यांच्या भूमिका सादर करणे. | विविध खाद्यपदार्थ, बोलक्या बाहुल्या, चित्रे |

ध्येय : CG-2 : मुले ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.5 : विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक ओळखण्याची क्षमता विकसित होते.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | ज्ञानेंद्रिय विकास | स्पर्शाची ओळख | १. दोन वस्तूंमधील कठीण/ कडक, मऊ, गार, गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत अशी स्पर्शांची तुलना करू शकतो. | १. मुलांना विविध प्रकारच्या वस्तूंच्या स्पर्शाचा अनुभव देणे.<br>२. मुलांना स्पर्शांतील फरक समजावणे. उदा. दगड-कडक, सँडपेपर-खरखरीत, संगमरवर-गुळगुळीत, चिरा-खडबडीत.<br>३. विविध स्पर्शांचा अनुभव देताना वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा सराव करणे.<br>४. मुलांनी त्यांना माहित असलेल्या विविध स्पर्शांच्या वस्तूंची उदाहरणे सांगणे.<br>५. वस्तू आणि स्पर्श यांवर आधारीत गीत म्हणणे. | दगड, कापूस, बर्फ, दूध, सँडपेपर, संगमरवर, चिरा, गीत |

ध्येय : CG-2 : मुले ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.6 : अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरिता ज्ञानेंद्रियामार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | योग | श्वसनाचे व्यायाम | १. हलक्या वस्तू जोरात फुंकर घालून उडवतो. उदा. कागद | १. हलक्या वस्तू जोरात फुंकर घालून उडविण्याची कृती मुलांना करून दाखविणे, (उदा. फुगे, कागदाचे तुकडे, कापूस, चॉकलेटचे वेष्टण इ.)<br>२. मुलांनी शिक्षकांच्या कृतीचे निरीक्षण करून स्वतः फुंकर घालून वस्तू उडविणे.<br>३. स्ट्रॉने पाण्यात बुडबुडे निर्माण करणे.<br>४. स्ट्रॉ व श्वासाच्या सहाय्याने एका पात्रातील वाटाणे दुसऱ्या पात्रात टाकणे.<br>५. बासरीत फुंकर घालून ध्वनी निर्माण करणे. | फुगे, कागदाचे तुकडे, कापूस, चॉकलेटचे वेष्टण, स्ट्रॉ, पाणी, वाटाणे, पात्रे, बासरी. |
| बलवाटिका २ | योग | श्वसनाचे व्यायाम, आसने | २. अल्प काळासाठी स्थिर बसतो किंवा पडून राहू शकतो. (शवासन करणे.) | १. मुलांना मांडी घालून स्थिर व शांत बसण्याची कृती करून दाखवणे.<br>२. मुलांनी अल्पकाळासाठी मांडी घालून स्थिर व शांत बसणे.<br>३. मांडी घालून ध्यानमुद्रेसह ओंकार, प्रार्थना किंवा श्लोक म्हणणे.<br>४. मुलांना शवासनाचे प्रात्यक्षिक करून दाखविणे. मुलांनी निरीक्षण करून शिक्षकांच्या कृतीचे अनुकरण करणे.<br>५. शवासन चालू असताना मोबाईलवर बासरीची धून ऐकवणे. | आसन, प्रार्थना, श्लोक, मोबाईल, बासरीची धून. |

ध्येय : CG-3 : मुले सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित करतात.
क्षमता : C-3.1 : विशिष्ट कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कारक कुशलता Motor | स्थूल स्नायू विकास, झेलणे, फेकणे | १. मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे उडविणे. या कृती जोर लावून करू शकतो. | १. शिक्षकांनी फेकलेला चेंडू मुलाने दोन्ही हातांनी झेलणे.<br>२. एका जागी उभे राहून मुलाने चेंडू हवेत वर फेकणे व झेलणे.<br>३. दोन्ही हातांनी चेंडू शिक्षक किंवा मित्राकडे फेकणे.<br>४. दुसऱ्याने फेकलेली रिंग झेलणे व त्याच्याकडे पुन्हा फेकणे.<br>५. आखून दिलेल्या वर्तुळात चेंडू फेकणे.<br>६. भिंतीवर ठराविक ठिकाणी चेंडू फेकणे.<br>७. मुलाने मोठ्या आकाराच्या चेंडूला पायाने ढकलणे.<br>८. समोरून घरंगळत येणाऱ्या चेंडूला पायाने ढकलणे. | चेंडू, रिंग, वर्तुळ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बलवाटिका २ | कारक कुशलता Motor Development | स्थूल स्नायू विकास, नेम धरून फेकणे | २. जवळच्या लक्ष्यावर चेंडू काही प्रमाणात अचूकतेने फेकतो. | १. डब्यांचा किंवा प्लास्टिक पेल्यांचा मनोरा चेंडूने नेम धरून खाली पाडणे.<br>२. दिलेल्या अंतरावरून चेंडू बादलीत टाकणे. | डबे, प्लास्टिक पेले, बादली, चेंडू |

ध्येय : CG-3 : मुले सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित करतात.
क्षमता : C-3.2 : विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कारक कौशल्य | तोल (balance) | १. एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभा राहू शकतो. | १. शिक्षकाने मुलांना आधाराशिवाय एका पायावर जास्त काळासाठी उभे राहण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविणे. (ध्रुवासन)<br>२. मुलांनी जास्त काळासाठी ध्रुवासन करून दाखवणे.<br>३. विटेवर/ लाकडी तुकड्यावर एका पायावर उभे राहणे.<br>४. ध्रुवासनाचे चित्र आणि चित्रफित दाखविणे. | विटा, लाकडी तुकडा, चित्र (ध्रुवासन), चित्रफित |
| बलवाटिका २ | कारक कौशल्य | तोल (balance) | २. ४-५ पावले एका पायावर उड्या मारतो. (लंगडी घालतो) | १. शिक्षकाने लंगडी घालण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवणे.<br>२. मुलांनी लंगडी घालणे.<br>३. लंगडीचा खेळ खेळणे.<br>४. लंगडी खेळाची चित्रफित दाखवणे. | चित्रफित |
| बलवाटिका २ | कारक कौशल्य | तोल | ३. वेगवेगळ्या पृष्ठभागांवर संतुलन साधू शकतो. जसे-विटा, शिडी. | १. शिक्षकांनी मुलांना वेगवेगळ्या पृष्ठभागांवर संतुलन साधून चालण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे. मुलांनी त्याप्रमाणे कृती करणे.<br>उदा. चुन्याच्या रेषेवरून हातात पाण्याचा ग्लास घेऊन चालणे, विटांवरून हात बाजूला घेऊन चालणे, शिडीवरून चढणे व उतरणे, लोंबकळणाऱ्या दोरखंडाला धरून वर जाण्याचा प्रयत्न करणे. | ग्लास, पाणी, विटा, शिडी, दोरखंड |

ध्येय : CG-3 : मुले सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित करतात.
क्षमता : C-3.3 : हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कारक कौशल्य | सूक्ष्म स्नायू विकास, हस्तनेत्र समन्वय | १. ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो, तसेच हस्तनेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदा. मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे-उघडणे, क्रेयॉन्सचा वापर करून चित्र काढणे) | १. कागदाचे मोठे आकार कापणे.<br>२. सरळ रेषेवर आणि वक्ररेषेवर कापणे.<br>३. कागदाचे घडीकाम करून कपाट, विमान, होडी यांसारख्या वस्तू बनविणे.<br>४. रंगीत कागदाच्या तुकड्यांचे चिकटकाम करणे.<br>५. क्रेयॉनचा वापर करून चित्र काढणे.<br>६. भेंडी, कांदा, बटाटा यांची कापे वापरून रंगांचे ठसेकाम करणे. बोटांचे ठसे काम करणे.<br>७. शिवणपाटी वापरणे.<br>८. ओल्या मातीचे विविध आकार बनवणे.<br>९. ठोकळ्यांचे विविध आकारबंध तयार करणे.<br>१०. लहान ठोकळ्यांचा मनोरा रचणे.<br>११. पेल्यातून किंवा ग्लासमधून बाटलीत पाणी भरणे.<br>१२. धान्य निवडणे.<br>१३. शेंगा सोलून दाणे काढणे.<br>१४. उकडलेले बटाटे, केळी, मऊ पेरू चिरणे.<br>१५. पीठ, धान्य चाळणे.<br>१६. पाणी गाळणे.<br>१७. दाणे, बिया कुटणे.<br>१८. बाटलीचे झाकण लावणे व उघडणे.<br>१९. लाकडी फळीवर स्क्रू फिरवून बसवणे.<br>२०. जेवताना व खाताना हाताचा व चमच्यांचा योग्य वापर करणे.<br>२१. बटण लावणे.<br>२२. दोऱ्यात मोठे मणी ओवणे.<br>२३. फुलांची माळ गुंफणे.<br>२४. ओळखता येतील अशी काही अक्षरे व अंक काढणे.<br>२५. लेखनासाठी किंवा चित्र काढण्यासाठी सातत्याने एकाच हाताचा वापर करणे.<br>वरील सर्व कृती शिक्षकांनी मुलांना आधी करून दाखविणे व मुलांनी निरीक्षण करून त्या प्रत्यक्ष करणे. | कागद, कात्री, रंगीत कागदाचे तुकडे, क्रेयॉन, भेंडी, कांदा, बटाटा, रंग, शिवणपाटी, माती, ठोकळे, पेला, ग्लास, बाटली, धान्ये, शेंगा, केळी, पेरू, पीठ, धान्य, गाळणी, बाटली, झाकण, लाकडी फळी, स्क्रू, स्क्रू ड्रायव्हर, चमचा, मणी, फुले, दोरा, कागद. |

ध्येय : CG-3 : मुले सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित करतात.
क्षमता : C-3.4 : एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कारक कौशल्य | चालणे | १. सरळ, नागमोडी, वक्ररेषेवर सहजतेने चालतो. | १. चुना, खडू किंवा दोरी वापरून सरळ नागमोडी व वक्ररेषा काढून शिक्षकांनी त्यावर चालून दाखविणे. मुलांनी निरीक्षण करून त्याप्रमाणे चालणे.<br>२. हातात बॅग, खेळणे किंवा आणखी एखादी वस्तू घेऊन सरळ, नागमोडी व वक्ररेषेवरून चालणे. | चुना, खडू, दोरी, विविध वस्तू |
| बालवाटिका २ | कारक कौशल्य | तोल सांभाळून चालणे | २. ६ इंच रुंदीच्या फळीवरून तोल सांभाळून चालतो. | १. शिक्षकांनी मुलांना ६ इंच रुंदीच्या फळीवरून तोल सांभाळून चालण्याचे प्रात्यक्षिक दाखवणे.<br>२. मुलांनी ६ इंच रुंदीच्या फळीवरून चालणे. | ६ इंच रुंदीची फळी |
| बालवाटिका २ | कारक कौशल्य | स्नायूंची ताकद | ३. एकावेळी एकाच पायाचा वापर करून जिन्यावरून सहजतेने चढ-उतार करतो. | १. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जिन्यावरून, स्टेजच्या पायऱ्यावरून एका पायाने चढ-उतार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवणे.<br>२. मुलांनी शिक्षकांप्रमाणे चालण्याची कृती करणे. | जिना, स्टेजच्या पायऱ्या |
| बालवाटिका २ | कारक कौशल्य | रांगणे | ४. बोगद्यामध्ये अरुंद जागी रांगू शकतो. | १. अरुंद जागी रांगण्याची चित्रफित दाखविणे.<br>२. मुलांनी रिकामे पिंप, टायर, मोठा खोका यांमधून रांगत जाणे.<br>३. एका विद्यार्थ्याला ओणवा करणे. मुलांनी त्याच्या खालून रांगत जाणे. | पिंप, टायर, मोठा खोका |
| बालवाटिका २ | कारक कौशल्य | उडी मारणे | ५. दोन्ही पायांनी उडी मारतो आणि एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून, साहाय्याने किंवा साहाय्य न घेता उडी मारतो. | १. एका गोलातून दुसऱ्या गोलात दोन्ही पायांनी उडी मारणे.<br>२. कमी उंचीच्या वस्तूवरून आधार घेऊन किंवा आधार न घेता उडी मारणे. उदा. लाकडी पेटीवरून स्टूलावरून, खुर्चीवरून, टायरवरून उडी मारणे. | लाकडी पेटी, स्टूल, खुर्ची, टायर |
| बालवाटिका २ | कारक कौशल्य | स्नायूंची ताकद | ६. शक्तीने एखादे काम करण्याची तयारी दर्शवतो. (जसे- वर्गातील छोट्या फर्नीचरची हलवाहलवी करण्यास मदत करतो.) | १. फुलझाडाची छोटी कुंडी उचलून नेणे.<br>२. पाण्याची बादली उचलून नेणे.<br>३. छोटे टेबल ढकलणे.<br>४. सामान भरलेली छोटी पेटी ढकलणे.<br>५. पुस्तकांचा गठ्ठा टेबलावर ठेवणे.<br>६. टायर ढकलणे. | कुंडी, बादली, टेबल, पेटी, पुस्तकांचा गठ्ठा, टायर |

**विकासक्षेत्र : सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास (मनोमय कोश विकास)**

ध्येय : CG-4 : मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

क्षमता : C-4.1 : कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सामाजिक विकास | 'स्व'ची ओळख | १. स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो. जिथे वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात.<br>२. स्वतःच्या ओळखीबाबतची इतर माहिती देतो जसे- पालकांचे नाव. | १. कुटुंबातील व्यक्तींची नावे व आपले त्यांच्याशी असलेले नाते सांगणे.<br>२. कुटुंबातील व्यक्तींची महत्त्वाची माहिती देणे. उदा. त्यांची नोकरी, त्यांचे काम.<br>३. कुटुंबाचे छायाचित्र आणण्यास सांगून त्याबद्दल गप्पागोष्टी करणे.<br>४. आपला पत्ता सांगणे.<br>५. गप्पागोष्टी करताना शेजाऱ्यांबद्दल बोलणे.<br>६. शाळेचे नाव व महत्त्वाची माहिती सांगणे.<br>७. चित्रे दाखवून समाजातील विविध मदतनीसांची ओळख करून देणे. | कुटुंबाचे छायाचित्र, मदतनीसांची चित्रे |

ध्येय : CG-4 : मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.

क्षमता : C-4.2 : विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | भावनांचा विकास | भावनांची ओळख | १. भावनांची, चेहऱ्यावरील हावभाव व शब्द यांच्याशी सांगड घालतो. | १. आनंद, राग, दुःख, प्रेम, भीती या भावनांची अभिव्यक्ती दर्शविणारी चित्रफित दाखवणे व त्यातील विविध भावनांविषयी संभाषण करणे.<br>२. विविध भावनांची चित्रकार्डे दाखवून मुलांना भावना ओळखण्यास सांगणे.<br>३. मुलांना विविध भावना व्यक्त करणारी चित्रकार्डे वाटणे. मुलांनी आपल्या हातातील चित्रकार्ड बघून तसेच चित्रकार्ड कोणाकडे आहे याचे निरीक्षण करून जोडी तयार करणे. | चित्रफित, चित्रकार्डे |
| बालवाटिका २ | भावनांचा विकास | भावनांची ओळख आणि अभिव्यक्ती | २. भावनांना शाब्दिक शब्दांद्वारे तसेच हावभाव व इतर प्रकारे व्यक्त करतो. जसे- चित्र रेखाटन/ देहबोली. | १. आनंद, राग, दुःख, प्रेम, भीती या भावना दर्शविणारी चित्रकार्डे जमिनीवर मांडणे. मुलांनी आपल्या आवडीचे चित्रकार्ड उचलून त्या भावनेची कृती व अभिनय करून दाखवणे.<br>२. 'मला खाऊ दे' हे एकच वाक्य प्रेम, दुःख व राग या भावना व्यक्त करण्यासाठी कृती व अभिनयातून वेगवेगळ्या प्रकारे कसे म्हणता येईल हे शिक्षकांनी स्वतः दाखविणे व मुलांना तशा प्रकारे म्हणण्यास सांगणे. | चित्रकार्डे |

ध्येय : CG-4 : मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
क्षमता : C-4.3 : इतर मुले आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सामाजिक विकास | मुले व प्रौढांची ओळख | १. कुटुंबातील जवळच्या/ ठराविक सदस्यांना ओळखतो, नावे सांगतो. | १. कुटुंबातील व्यक्तींचा परिचय करून देणारा बोलक्या बाहुल्यांचा संवाद ऐकवणे.<br>२. गप्पागोष्टींच्या माध्यमातून मुलांनी कुटुंबातील व्यक्तींचा परिचय करून देणे. | बोलक्या बाहुल्या |
| बालवाटिका २ | सामाजिक विकास | मुले व प्रौढांशी संवाद | २. परिचित मोठ्या व्यक्तींशी सहजतेने संवाद साधतो. | १. बालवाटिकेतील मुलगा/ मुलगी परिचित मोठ्या व्यक्तींशी संवाद करणाऱ्या प्रसंगाची चित्रफित दाखवणे.<br>२. शिशुवाटिकेत दुसऱ्या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षिकेशी मुलांना गप्पागोष्टी करण्याची संधी देणे. | चित्रफित |
| बालवाटिका २ | सामाजिक | मैत्रीभाव सहकार्य | ३. ओळखीच्या मुलांसोबत सहजतेने उत्स्फूर्तपणे, खेळामध्ये सहभागी होतो, आवश्यकतेनुसार मोठ्यांच्या मदतीने खेळणाऱ्या बालकांच्या गटात सहभागी होतो. | १. ओळखीच्या मुलांसोबत सहज खेळता येतील असे खेळ आयोजित करणे. उदा. मातीकाम, ठसेकाम, रंगकाम.<br>२. मुलांचे गटशः खेळ घेणे. उदा. वाळूत किल्ला तयार करणे, एकमेकांचे हात धरून करायचे नृत्य, भातुकलीचा खेळ इत्यादी. | ओलीमाती, भेंडी, काकडी, बटाटे, कागद, रंग, वाळू, नृत्य, भातुकलीच्या खेळाचे साहित्य |

ध्येय : CG-4 : मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
क्षमता : C-4.4 : इतर मुलांबरोबर सहकार्याच्या वृत्तीने वागतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सामाजिक विकास | सहकार्य | १. इतर मुलांसोबत खेळताना आनंद घेतो. | १. बागेत लपाछपीचा खेळ खेळणे.<br>२. दोन गटांनी रस्सी खेचण्याचा खेळ खेळणे.<br>३. जोडीदाराचा हात धरून धावण्याचा खेळ खेळणे.<br>४. एका मुलाचा उजवा व दुसऱ्याचा डावा पाय रुमालाने बांधून धावण्याचा खेळ खेळणे.<br>५. संगीताची धून वाजताना मुक्त नृत्यात सहभागी होणे.<br>६. समूहगीत म्हणणे. | रस्सी, रुमाल, संगीत, समूहगीत |

ध्येय : CG-4 : मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
क्षमता : C-4.5 : शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सामाजिक विकास | सहकार्य | १. इतर मुलांसोबत दैनंदिन कृतीमध्ये आनंद घेतो. | १. वर्गाची स्वच्छता करणे.<br>२. बागेत पडलेली वाळलेली पाने गोळा करून एका कोपऱ्यात ठेवणे.<br>३. प्रार्थना सत्र, खेळ, नृत्य, गीतगायन यात सहभागी होणे. | पाने, प्रार्थना सत्र, खेळ, नृत्य, गीतगायन |
| बालवाटिका २ | नैतिक विकास | शिस्त पाळणे | २. आपली वेळ येण्याची वाट पाहतो. | १. प्रार्थनासत्रात रांगेत नीट बसणे.<br>२. भोजनापूर्वी आणि भोजनानंतर हात व तोंड धुण्यासाठी रांगेत उभे राहणे.<br>३. कोणत्याही उपक्रमात सहभागी होताना आपली वेळ येईपर्यंत वाट पाहण्याची मुलांना सवय लावणे. | प्रार्थनासत्र, उपक्रम |
| बालवाटिका २ | नैतिक विकास | सूचनांचे पालन करणे. | ३. साध्या लहान सूचनांचे पालन करतो. | १. 'सैनिक म्हणतो' हा खेळ खेळणे. सैनिक म्हणतो खाली बसा, सैनिक म्हणतो टाळी वाजवा. याप्रमाणे सांगितलेली कृती मुलांनी करणे. इतर कोणाचेही नाव घेऊन तो म्हणतो असे म्हणून कोणतीही कृती सांगितल्यास ती न करणे.<br>२. ठसेकाम, घडीकाम, रंगकाम यांसारख्या कृती करताना मुलांनी शिक्षिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करणे.<br>३. वर्गात बसणे, डब्यातील खाऊ खाणे, स्वच्छतागृहात जाणे, मैदानावर किंवा बागेत जाणे, खेळ खेळणे यांसारख्या कृती करण्यापूर्वी मुलांना योग्य सूचना देणे. सूचना पाळणाऱ्या मुलांचे कौतुक करणे. | खेळ, ठसेकाम, घडीकाम, रंगकाम |

ध्येय : CG-4 : मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.
क्षमता : C-4.6 : गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतीसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | नैतिक विकास | दयाभाव | १. इतर बालके आणि प्रौढांप्रती आपुलकी दर्शवितो. | १. आई, वडील आणि इतर प्रौढांप्रती आपुलकी दर्शविण्याचा संदेश देणाऱ्या गोष्टी सांगणे.<br>२. मित्र-मैत्रिणींशी आणि मोठ्या माणसांशी कसे वागावे याविषयी बोलक्या बाहुल्यांचा संवाद.<br>३. घरी आलेल्या पाहुण्यांशी कसे वागावे याविषयी गप्पागोष्टी करणे.<br>४. आईवरील प्रेम व्यक्त करणारी कविता म्हणणे.<br>५. इतर मुलांशी प्रेमाने व आपुलकीने वागणाऱ्या मुलांचे सर्वांसमोर कौतुक करणे. | गोष्टी, बोलक्या बाहुल्या, गाणी, कविता |

| ध्येय : CG-4 : मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात.<br>क्षमता : C-4.7 : इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **स्तर/ इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** |
| बालवाटिका २ | सामाजिक विकास | समता समरसता | १. बालक सर्व मुलांशी त्यांच्या पार्श्वभूमी व क्षमतांचा विचार न करता खेळतो व संवाद साधतो. | १. निसर्गभ्रमण, सहल यांसारखे उपक्रम आयोजित करून सहभोजनाची संधी निर्माण करणे. मुलांनी आपल्या डब्यातील पदार्थ इतरांना वाटून खाणे.<br>२. एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवण्याची कृती असलेले नृत्य करणे.<br>३. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मैत्री करण्याचा संदेश देणारी चित्रफित दाखवणे. | सहभोजन, नृत्य, चित्रफित |

| ध्येय : CG-5 : मुले उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.<br>क्षमता : C-5.1 : इतरांना मदत करण्यासाठी वयानुरुप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवितो आणि त्यामध्ये सहभागी होतो. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **स्तर/ इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** |
| बालवाटिका २ | सामाजिक विकास | मदत करणे, श्रम | १. वर्ग सुव्यवस्थित ठेवण्यासाठी शिक्षकांना मदत करतो. | १. वर्ग सुव्यवस्थित ठेवण्यासाठी काम करण्याची मुलांना संधी देणे. उदा. (१) वर्गात पडलेला कचरा, कचरापेटीत टाकणे. (२) खेळणी, ठोकळे, बाहुल्या यांसारख्या अध्ययन कोपऱ्यातील विविध वस्तू जागेवर नीट मांडण्यास शिक्षकांना मदत करणे. (३) क्रियाकलाप करताना शिक्षिकेने सांगितलेल्या कामात मदत करणे. (४) वर्गसजावटीच्या कामात शिक्षिकेला मदत करणे. | कचरापेटी, खेळणी, ठोकळे, बाहुल्या, इतर वस्तू. |

ध्येय : CG-6 : मुले स्वतःभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.
क्षमता : C-6.1 : सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | भावनिक विकास | सजीव सृष्टी प्रेमभाव | १. विनाकारण झाडे आणि प्राणी यांना इजा करत नाही. | १. निसर्गभ्रमण, सहल आयोजित करून मुलांना निसर्ग आणि सजीव सृष्टीच्या सहवासाचा आनंद अनुभवायला देणे.<br>२. कुंडीत रोप लावणे, पाणी घालणे.<br>३. गोठा किंवा गोशाळेला भेट देऊन गायींच्या सहवासात राहणे, त्यांच्या अंगावरून हात फिरवणे.<br>४. गाय, म्हैस, बैल यांना गवत देणे.<br>५. झाडे व प्राणी यांच्याविषयी मैत्रभाव निर्माण करणारी चित्रफित दाखवणे.<br>६. झाडे व प्राणी यांच्या विषयी प्रेमभाव निर्माण करणारी गाणी म्हणणे.<br>७. झाडे, प्राणी व पक्षी यांना विनाकारण इजा करू नये, हा विचार समजावून सांगण्यासाठी मुलांशी चर्चा करणे. | कुंडी, रोप, गोठा, गोशाळा, गाय, म्हैस, बैल, झाडे, चित्रफित, गाणी |

**विकासक्षेत्र : बोधात्मक विकास (विज्ञानमय कोश विकास)**

ध्येय : CG-7 : मुले निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
क्षमता : C-7.1 : वेगवेगळ्या वर्गातील/ गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सृष्टी परिचय | वस्तू व्यक्ती प्राणी पक्षी घटना | १. वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. नावासहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. | १. विविध वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची चित्रे दाखवणे व त्यांचे नाव ओळखण्यास सांगणे. उदा. हत्ती, मांजर, कावळा, मोर, बस स्टँड, बाजार इ.<br>२. विविध वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची चित्रे दाखवून मुलांना त्यांचे वर्णन करण्यास सांगणे.<br>३. वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची अधिक माहिती देण्यासाठी मुलांना चित्रफिती दाखवणे व त्यांविषयी गप्पागोष्टी करणे.<br>४. वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी यांचे वर्णन करून मी कोण असे विचारणारी 'कोडी' घालणे.<br>५. वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी यांच्यावर आधारित कविता म्हणणे.<br>६. वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी यांविषयी बोलक्या बाहुल्यांचा संवाद सादर करणे. | वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची चित्रे, चित्रफिती, कोडी, कविता, बोलक्या बाहुल्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सृष्टि परिचय | वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, निरीक्षण | २. परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ३ ते ५ भाग ओळखतो. | १. प्राणी, पक्षी, व्यक्ती यांचे काही अवयव अपूर्ण असणारे चित्र मुलांना दाखवणे. मुलांनी अपूर्ण अवयव ओळखणे. (उदा. एक कान, एक पाय, शेपूट नसलेली गाय)<br>२. प्राणी, पक्षी, व्यक्ती यांच्या चित्रांचे कापलेले भाग योग्य रितीने जोडून मुलांनी चित्र पूर्ण करणे. (३ ते ५ भाग) | प्राणी, पक्षी, व्यक्ती यांची चित्रे, चित्रांचे कापलेले भाग |
| बालवाटिका २ | सृष्टि परिचय | श्रेणीबद्ध संबंध | ३. गटामधील श्रेणीबद्ध संबंध ओळखतो (उदा. प्राणी आणि त्यांची लहान पिल्ले) | १. कार्यपुस्तिकेतील प्राणी, पक्षी आणि त्यांची घरे यांच्या जोड्या जुळविणे.<br>२. प्राणी आणि त्यांची पिल्ले यांच्या जोड्या जुळविणे. | कार्यपुस्तिका |
| बालवाटिका २ | सृष्टि परिचय | तुलना | ४. गटात आणि गटांमध्ये तुलना करतो. | १. गाय आणि म्हैस यांची चित्रे दाखवून त्यांच्या तुलनेवर चर्चा करणे. (उदा. रंग, ओरडणे, स्वभाव या बाबतीत तुलना) | चित्रे |
| बालवाटिका २ | खेळ | पर्यायी क्रीडा साहित्य | ५. पर्यायी वस्तूंचा वापर करून खेळतो (उदा. टेलिफोन म्हणून इतर वस्तू वापरतो.) | १. कपड्याचे तुकडे एकत्र बांधून फुटबॉल खेळणे.<br>२. खुर्चीवर बसून गाडी चालवण्याचा खेळ खेळणे. | कपड्याचे तुकडे, खुर्ची |
| बालवाटिका २ | वस्तूंचा परिचय | वस्तूंचा वापर | ६. वस्तू आणि त्यांचा वापर यांच्यात संबंध निर्माण करतो. (उदा. चमचा– खाण्यासाठी, बादली– आंघोळीसाठी) | १. कार्यपुस्तिकेत वस्तू आणि त्यांचा वापर यांच्या जोड्या जुळविणे. (उदा. केरसुणी– कचरा, छत्री– पाऊस) | कार्यपुस्तिका |

ध्येय : CG-7 : मुले निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
क्षमता : C-7.2 : निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/ पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | जीवन कौशल्य | निरीक्षण, ज्ञात माहितीचा वापर | १. ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो. (उदा. पुस्तकातील चित्राप्रमाणे ठोकळ्यांचा महाल/ मनोरा बनवितो) | १. स्वतःची कल्पना वापरून बोटांनी ठसेकाम करणे.<br>२. पुस्तकातील चित्रे पाहून ठोकळ्यांचे आकारबंध तयार करणे. | कागद, रंग, ठोकळे, चित्रपुस्तके |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | पर्यावरण | उन्हाळा हिवाळा | २. उन्हाळा आणि हिवाळा ओळखतो. | १. उन्हाळ्यातील वातावरणाची काही चित्रे दाखवणे. (उदा. जळणारा सूर्य, पंख्याने वारा घेणारी व्यक्ती) मुलांशी संभाषण करून, कडक उन्हाचा होणारा त्रास सतत लागणारी तहान, अंगातून येणारा घाम या अनुभवांची चर्चा करून उन्हाळा ही संकल्पना स्पष्ट करणे.<br>२. स्वेटर, कानटोपी, ब्लँकेट यांसारख्या वस्तू आपण केव्हा वापरतो, याविषयी मुलांशी चर्चा करून 'हिवाळा' ही संकल्पना स्पष्ट करणे. | चित्रे |
| बालवाटिका २ | पर्यावरण | सूर्य, चंद्र, तारे, ढग | ३. आकाशातील खगोल शास्त्रीय गोष्टी ओळखतो. | १. निसर्गभ्रमणासाठी नेऊन मुलांना परिसर व आकाशाचे निरीक्षण करण्यास प्रवृत्त करणारे प्रश्न विचारणे. संभाषणातून सूर्य व ढग यांविषयी चर्चा करणे.<br>२. चित्रफित दाखवून रात्री दिसणारा चंद्र, त्याचे बदलते आकार, चमकणारे तारे यांविषयी चर्चा करणे.<br>३. बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून सूर्य आणि चंद्र यांच्या भूमिका सादर करणे.<br>४. सूर्य, चंद्र, तारे, ढग यांविषयावरील कविता म्हणणे.<br>५. सूर्य, चंद्र, तारे, ढग यांच्यावर आधारित गोष्टी सांगणे. | सूर्य, ढग, चित्रफित, बोलक्या बाहुल्या, कविता, गोष्टी |
| बालवाटिका २ | बोधात्मक विकास | आवड व निवड | ४. स्वतःचे प्राधान्यक्रम, आवड व्यक्त करतो आणि त्यानुसार निवड करतो. | १. वर्गातील विविध वस्तू, खेळणी, साहित्य पसरवून ठेवणे. मुलांनी खेळण्यासाठी त्यांना आवडणारी वस्तू, खेळणे किंवा साहित्य निवडणे. तीच वस्तू व खेळ का निवडला याविषयी मुलांशी चर्चा करणे.<br>२. मुलांना आवडणारे कपडे, खाद्यवस्तू यांविषयी संभाषण करणे. ते कपडे व खाद्यवस्तू का आवडतात यांविषयी चर्चा करणे.<br>३. मला आवडणारे खेळणे या विषयावर बोलक्या बाहुल्यांचा संवाद | वस्तू, खेळणी, साहित्य, बोलक्या बाहुल्या |
| बालवाटिका २ | पर्यावरण | सूर्य, चंद्र, दिवस, रात्र, ढग, झाडे, पाऊस, उन्हाळा, हिवाळा | ५. शिक्षक व समवयस्कांच्या मदतीने पर्यावरणातील घटना व प्रसंगाबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो. | १. पर्यावरणावर आधारित चित्रफिती, चित्रे मुलांना दाखवणे.<br>२. सूर्य, चंद्र, दिवस, रात्र, ढग, झाडे, पाऊस, उन्हाळा, हिवाळा यांसारख्या मुलांना परिचित असलेल्या विषयांवर मुलांना सोपे प्रश्न विचारणे. मुलांनी स्वतःहून/ मित्रांशी, शिक्षकांशी चर्चा करून त्या प्रश्नांची उत्तरे देणे. | चित्रफिती, चित्रे, चित्रपुस्तके |
| बालवाटिका २ | पर्यावरण | झाडे, प्राणी, पक्षी | ६. झाडे, प्राणी, पक्षी यांच्या गरजांविषयी स्वतःचे मत मांडतो. | १. झाडे, प्राणी व पक्षी यांच्याविषयी प्रेम व दयाभाव निर्माण करणाऱ्या गोष्टी मुलांना सांगणे.<br>२. चित्रफिती, कविता, लोकगीते यांच्या माध्यमातून झाडे, प्राणी व पक्ष्यांच्याही काही गरजा असतील अशी जाणीव मुलांच्या मनात निर्माण करणे.<br>३. गटशः चर्चा करून झाडे, प्राणी व पक्षी यांच्या गरजांविषयी स्वतःचे मत मांडण्याची मुलांना संधी देणे. | गोष्टी, चित्रफिती, कविता, लोकगीते |


ध्येय : CG-7 : मुले निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
क्षमता : C-7.3 : दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | जीवन कौशल्य | निर्णय क्षमता, साधनांचा वापर | १. खेळताना बालक साधी साधने वापरण्याकडे कल दर्शवितो. | १. अध्ययन कोपऱ्यातील मुलांना त्यांच्या आवडीचे साहित्य निवडून खेळण्याची संधी देणे.<br>उदा. नवे आकृतिबंध तयार करण्यासाठी मुलांनी आपल्या आवडीचे आणि योग्य आकाराचे व रंगाचे ठोकळे निवडणे.<br>भातुकलीसाठी आवडीची व योग्य ती साधनसामग्री निवडणे, खेळण्यासाठी साधी, सोपी व आपल्या हातात बसेल अशी बॅट, चेंडू, रिंग इत्यादी साहित्य निवडणे, चित्र रंगविण्यासाठी आवडीचे रंग निवडणे. | ठोकळे, भातुकलीचे साहित्य, बॅट, चेंडू, रिंग, रंग |
| बालवाटिका २ | जीवन कौशल्य | तंत्रज्ञानाचा वापर | २. डिजिटल व दृक्श्राव्य साहित्य वापरताना काळजीपूर्वक लक्ष देतो. | १. डिजिटल व दृक्श्राव्य माध्यमाची साधने मुलांना प्रत्यक्ष दाखवणे.<br>२. डिजिटल व दृक्श्राव्य माध्यमाच्या सहाय्याने शैक्षणिक अध्ययन अनुभवासाठी विविध चित्रफिती दाखविणे. दृक्श्राव्य माध्यमातून बडबडगीते, संवाद, संगीत, नृत्य, नाट्य यांचे अनुभव देणे.<br>३. डिजिटल व दृक्श्राव्य साधने वापरताना घ्यावयाच्या काळजीसंबंधी चर्चा करणे. | डिजिटल व दृक्श्राव्य साधने |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.1 : एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे वस्तू गटात आणि उपगटातून वेगळ्या करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | माहितीचे व्यवस्थापन | वस्तूंचे वर्गीकरण<br>● आकार (लहान, मोठा, सर्वांत मोठा),<br>● लांबी (लांब, आखूड, सर्वांत आखूड) ● वजन (जड, हलका, सर्वांत हलका)<br>● उंची (उंच, ठेंगणा, सर्वांत ठेंगणा) | १. आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू तीन गटात वेगळ्या करतो. (लहान आकाराचे, मोठ्या आकाराचे, सर्वांत मोठ्या आकाराचे) | १. शिक्षकांनी मुलांना प्रत्यक्ष वस्तू दाखवून लहान-मोठा, लांब-आखूड, जड-हलका, उंच-ठेंगणा या शब्दांचा वापर करून तुलना करून दाखवणे.<br>२. वेगवेगळ्या लांबीच्या तीन-तीन वस्तू घेऊन त्यांचे लांबीनुसार तीन गट करून दाखवणे व नंतर मुलांकडून त्याचे प्रात्यक्षिक करून घेणे. जसे- आखूड, लांब व सर्वांत लांब.<br>३. आकार, लांबी, उंची व वजन या निकषांवर मुलांकडून वस्तूंची तीन गटात विभागणी करून घेणे. जसे- आकाराने लहान-मोठी व सर्वांत मोठी वस्तू, आखूड-लांब व सर्वांत लांब वस्तू, हलकी-जड व सर्वांत जड वस्तू.<br>४. विविध वस्तूंच्या चित्रांचे तीन गट असलेले तक्ते लावून मुलांकडून विविध तुलनात्मक शब्दांचा सराव करून घेणे.<br>५. वेगवेगळ्या वस्तू देऊन आकार, लांबी, वजन व उंची या निकषांच्या आधारे वस्तू क्रमाने लावण्याचा खेळ घेणे. | पेन, पेन्सिल, पट्टी, ठोकळे, मणी, फुले, पाने, बिया, खडे, खडूचे तुकडे यांसारख्या विविध वस्तू, चित्रे |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.2 : आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्या आधारे साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | आकृतिबंध | वस्तू, आकार, चित्रे यांतील आकृतिबंध ओळखणे व विस्तार करणे. | १. आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो. ३ ते ४ वस्तू, आकार, चित्रे वापरून ABC ABC प्रकारचा आकृतिबंध तयार करतो. (पेन – पुस्तक – पेन्सिल, पेन – पुस्तक – पेन्सिल, अबक – अबक – अबक | १. ३ ते ४ वस्तूंच्या मांडणीतील आकृतिबंधांचे निरीक्षण करण्यास सांगणे, घटक व त्यांचा क्रम यांवर चर्चा करणे.<br>२. मुलांनी कृतिपत्रिकेत दिलेल्या आकृतिबंधातील पुनरावृत्तीचे निरीक्षण करणे व आकृतिबंध पूर्ण करणे.<br>उदा. ○ □ △, ○ □ △, --------<br>३. दिलेल्या ३ ते ४ वस्तूंपासून मुलांनी स्वतः आकृतिबंध तयार करणे व त्याचा पुढे विस्तार करणे.<br>४. आकृतिबंधाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन आकृतिबंधाचा विस्तार करणे व तो पूर्ण करणे.<br> ----------<br>५. कात्रीने कागदाच्या पट्ट्या व आकार कापणे व त्यातून आकृतिबंध तयार करणे. | पाने, फुले, बिया, पेन्सिल, पेन–पुस्तक, फळे, आकार, कागद, कात्री |
| बालवाटिका २ | आकृतिबंध | ध्वनींचे आकृतिबंध ओळखणे, विस्तार करणे व तयार करणे. | २. आवाज किंवा विशिष्ट कृतींमधील आकृतिबंध ओळखतो व आकृतिबंधाचा विस्तार करतो. | १. तीन आवाजांचा आकृतिबंध मुलांना ऐकवणे व त्यांची पुनरावृत्ती करायला सांगणे. उदा. चमचा, वाटी, टेबल व इतर वाद्यांचे आवाज.<br>२. तीन कृतींचा आकृतिबंध दाखवणे व मुलांना त्याची पुनरावृत्ती करायला सांगणे. (उदा. ठसेकाम, रंगीत कागदांचे तुकडे चिकटवणे) | चमचा, वाटी, टेबल, इतर वाद्ये, भेंडी, कांदा, बटाटे, कागद |
| बालवाटिका २ | आकृतिबंध | हालचाल विषयक आकृतिबंधांची ओळख, विस्तार व आकृतिबंध तयार करणे. | ३. तीन विविध शारीरिक हालचालींचा आकृतिबंध स्पष्टपणे ओळखतो. | १. तीन विविध शारीरिक हालचालींचा आकृतिबंध दाखवून मुलांना त्याची पुनरावृत्ती करायला सांगणे. उदा. उडी मारून, मान हलवून, हवेत हात वर करणे.<br>२. चित्रफितीच्या माध्यमातून मुलांना तीन विविध शारीरिक हालचालींचे आकृतिबंध दाखवून त्यांचे अनुकरण करण्यास सांगणे.<br>३. नृत्याच्या माध्यमातून विविध हालचालींची पुनरावृत्ती करण्याची संधी देणे. | चित्रफित, नृत्य |



ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.3 : १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (पुढे आणि मागे) दोन्ही मोजतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | संख्यानामे | संख्यानामे १ ते १० | १. १० पर्यंतची संख्यानामे योग्य क्रमाने सांगतो/ गातो आणि ५ पर्यंतची संख्यानामे व वस्तू यांची एकास एक संगती लावतो. | १. १० पर्यंतची संख्यानामे क्रमाने म्हणता येण्यासाठी कृतियुक्त बडबडगीते गाणी ऐकवणे व म्हणण्यास सांगणे.<br>२. १० पर्यंतची संख्यानामे क्रमाने म्हणण्याचा सराव घेणे. (उलट-सुलट)<br>३. १० पर्यंतचा वस्तूसमूह घेऊन ५ पर्यंतची संख्यानामे आणि वस्तू यांची एकास एक संगती लावून दाखवणे. वस्तू आणि संख्यानामे यांची एकास एक संगती लावण्याची मुलांना संधी देणे. | बडबडगीते, गाणी, वस्तू |
| बालवाटिका २ | संख्याबोध | संख्यानामे १ ते १० वस्तू | २. अंकांचे मूल्य समजून घेऊन वस्तूंची मोजणी करतो. (५ पर्यंतचा संच ओळखतो) | १. परिसरातील ५ वस्तू मोजणे.<br>२. दिलेल्या वस्तू समूहातून मुलांनी ५ पर्यंतच्या वस्तूंचा गट बाजूला काढून ठेवणे.<br>३. ५ पर्यंतच्या वस्तूंचे/ चित्रांचे विविध गट मुलांसमोर ठेवून त्यातील वस्तू किती ते ओळखण्याचा खेळ घेणे. | वस्तू, चित्रे |
| बालवाटिका २ | संख्याबोध | संख्यानामे १ ते १० वस्तू | ३. संख्येबाबतची समज दर्शवतो. (उदा. ५ म्हणजे ५ विविध वस्तू, ५ व्यक्ती, ५ पुस्तके, ५ पेन्सिली इत्यादी) | १. ५ पर्यंतचे कोणतेही संख्यानाम उच्चारून परिसरातील कोणत्याही ५ वस्तू दाखवण्यास सांगणे. उदा. ५ मुले, ५ चित्रे, ५ ठोकळे, ५ बाहुल्या इ. | विविध वस्तू |
| बालवाटिका २ | संख्याबोध | संख्यानामे १ ते १० वस्तू | ४. ५ पर्यंत मूर्त बाबी, सुट्या वस्तू, अमूर्त गोष्टी सहजतेने मोजतो. | १. ५ पर्यंतच्या वस्तू/ चित्रे/ प्रतीके यांच्या मदतीने ५ गोष्टी मोजणे.<br>२. एखादी कृती किती वेळा झाली ते मोजणे.<br>उदा. १. टाळ्या वाजवणे.<br>२. उड्या मारणे.<br>३. गिरक्या घेणे. | वस्तू, चित्रे, प्रतीके |
| बालवाटिका २ | संख्याबोध | संख्यानामे १ ते १० | ५. १० पर्यंतच्या संख्या (स्मृती आधारे योग्य क्रमाने मोजतो.) | १. कृतियुक्त बडबडगीतातून १० पर्यंतच्या संख्या क्रमाने मोजण्याचा सराव देणे.<br>२. टाळी वाजवून १० पर्यंतच्या संख्या मोजणे. | बडबडगीते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | संख्याबोध | संख्यानामे १ ते १० | ६. २० पर्यंतच्या संख्या मोजण्यास सुरुवात करतो. | १. २० पर्यंतच्या संख्या, वस्तू, प्रतिके यांच्या सहाय्याने मोजण्यास सांगणे.<br>उदा. १० आणि १ = ११<br>११ आणि २ = १३<br>१० आणि १० = २०<br>२. १ ते २० पर्यंत संख्या सलगपणे मोजण्याचा सराव घेणे.<br>३. सापशिडीचा खेळ खेळणे. | वस्तू, प्रतिके, सापशिडी |
| बालवाटिका २ | संख्याबोध | संख्यानामे १ ते १० | ७. ४ वस्तूंचा गट एका दृष्टिक्षेपात तात्काळ ओळखतो.<br>(उदा. ४ बिस्किटे, फळे, ठोकळे न मोजता सांगतो.) | १. विविध वस्तूंचा समूह २ च्या गटात, ३ च्या गटात व ४ च्या गटात दाखवून एका दृष्टिक्षेपात सांगण्याचा सराव करून घेणे. | वस्तू समूह |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.4 : चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ प्रयंतच्या संख्यांची मांडणी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | संख्याबोध | क्रमसंबंध | १. ३ स्तरांपर्यंत आकाराच्या आधारावर वस्तूंची क्रमवारी लावतो आणि त्यांचे स्तर शब्दबद्ध करतो. (मोठे- लहान - जास्त लहान, लांब- आखूड - जास्त आखूड) | १. उंचीनुसार तीन वस्तूंची तीन स्तरांत तुलना करणे. तिन्ही वस्तूंची मांडणी करून ती शब्दात सांगणे. (जसे- ठेंगणा, उंच, सर्वांत उंच)<br>२. लांबीनुसार, आकारानुसार, जाडीनुसार तीन स्तरांत वस्तूंची मांडणी करून ती शब्दांत सांगणे. (जसे- लांब, आखूड, जास्त आखूड, मोठे-लहान, सर्वांत लहान)<br>३. विविध आकारांच्या तीन राशी मांडून मुलांना त्यातील लहान, मोठी, सर्वांत मोठी राशी ओळखण्यास सांगणे. | विविध वस्तू |

<table>
<tr><td colspan="6">ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.<br>क्षमता : C-8.5 : स्थानिक किंमतीचा वापर करून ९९ पर्यंतच्या संख्या दर्शविण्यासाठी संख्या चिन्हांचा वापर करतो आणि संख्या ओळखतो.</td></tr>
<tr><th>स्तर/ इयत्ता</th><th>घटक</th><th>उपघटक</th><th>अध्ययन निष्पत्ती</th><th>अध्ययन अनुभव</th><th>अध्ययन साधने</th></tr>
<tr><td>बालवाटिका २</td><td>संख्या आणि त्यांचा संबंध</td><td>संख्येची तुलना</td><td>१. ५ पर्यंत संख्या ओळखतो.</td><td>१. वस्तूंची चित्रे आणि त्यांबरोबर त्यांची संख्याचिन्हे असलेली चित्रकार्डे दाखवून ५ पर्यंतच्या संख्या व चिन्हे ओळखण्यास सांगणे.<br>उदा.
<table>
<tr><td></td><td>१</td><td>टेबल</td></tr>
<tr><td></td><td>२</td><td>चेंडू</td></tr>
<tr><td></td><td>३</td><td>पाने</td></tr>
<tr><td></td><td>४</td><td>झाडे</td></tr>
<tr><td></td><td>५</td><td>फुले</td></tr>
</table></td><td>चित्रे, चित्रकार्डे</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>२. ५ पर्यंत दोन संख्यांची तुलना करतो व च्यापेक्षा जास्त, च्यापेक्षा कमी असा शब्दसंग्रह वापरतो.</td><td>१. ५ पर्यंतच्या वस्तू दाखवून त्या वस्तूदर्शक संख्या ओळखण्यास सांगणे. वस्तूंच्या साहाय्याने संख्यांची तुलना करणे.<br>२. वस्तूंचे समूह दाखवून 'च्या पेक्षा जास्त', 'च्या पेक्षा कमी' या तुलनादर्शक शब्दांचा वापर करण्याची संधी देणे. उदा. कानांची संख्या हातांच्या बोटांपेक्षा कमी.<br>३. वस्तूंच्या संख्यांची तुलना व तुलनादर्शक शब्दप्रयोग वापरणे.<br>उदा.
<table>
<tr><td><br>'अ'</td><td><br>'ब'</td><td><br>'क'</td></tr>
</table>
● 'ब' गटात 'क' गटापेक्षा कमी पाने आहेत<br>● 'क' गटात 'ब' गटापेक्षा जास्त पाने आहेत.<br>● 'अ' गटात 'ब' गटापेक्षा कमी पाने आहेत.</td><td></td></tr>
</table>

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.6 : संख्याना जोडणे व विभागणे या लवचिक कार्यनीतीचा वापर करून दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज | १. ५ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो. पुन्हा मोजतो. (उदा. माझ्याकडे २ आणि माझ्या बहिणीकडे ३ चॉकलेटस् आहेत, तर आता आमच्याकडे एकूण किती चॉकलेटस् आहेत?) | १. ५ पर्यंतच्या वस्तूंची परस्पर देवाण-घेवाण करून बेरीज हा संबोध स्पष्ट करण्यासाठी खेळ घेणे.<br>उदा. अजयकडे २ पुस्तके आहेत, विजयकडे ३ पुस्तके आहेत, तर दोघांकडे मिळून किती पुस्तके होतील?<br>२. दिलेल्या वस्तू समूहातून १, २, ३, ४, ५ वस्तूंचा गट तयार करणे.<br>३. बेरजेची कृती असणारे बडबडगीत, गोष्ट सांगून बेरीज हा संबोध लक्षात आणून देणे. | पुस्तके, गाणी, गोष्टी |
| बालवाटिका २ | मूलभूत गणिती क्रिया | वजाबाकी | २. वस्तूंच्या गटातून ५ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो व मोजतो. | १. ५ पर्यंतच्या वस्तूंची परस्पर देवाण-घेवाण करून वजाबाकी हा संबोध समजावून सांगणे.<br>उदा. गीताकडे ४ चेंडू आहेत. त्यातील २ चेंडू तिने नीताकडे दिले, तर गीताकडे किती चेंडू उरतील?<br>२. वजाबाकीची कृती असलेली गोष्ट सांगणे. | चेंडू, गोष्ट |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.7 : गुणाकार म्हणजे पुन्हा-पुन्हा बेरीज आणि भागाकार म्हणजे समान वाटणी हे समजतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | मूलभूत गणिती क्रिया | भागाकार पूर्व तयारी | १. २ जणांमध्ये वस्तूंचे समान वाटप करतो. (६ पर्यंत) | १. ६ वस्तूंचा संच २ जणांत समान वाटण्यास सांगणे. प्रत्येकाला किती वस्तू मिळाल्या? समान वाटणी झाली का? यासंबंधी चर्चा करणे.<br>२. ५ वस्तूंचा संच २ जणांत समान वाटण्यास सांगणे. वस्तू उरतात का? उरलेली वस्तू वाटता येईल का? यावर चर्चा करणे. | वस्तू |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.8 : मूलभूत भौमितिक आकार ओळखतो, ते तयार करतो, त्याचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सांगतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | भौमितिक आकार | ओळख वर्गीकरण | १. भिन्न माप आणि रंग यांच्या आधारे आकारांच्या जोड्या लावतो. | १. भौमितिक आकार आणि त्या आकाराच्या वस्तू यांच्या जोड्या लावणे. (कृतिपत्रिका)<br>२. रंग आणि मापे भिन्न असलेल्या समान आकाराच्या वस्तूंच्या जोड्या जुळविणे. (कृतिपत्रिका)<br>३. रंग आणि मापे भिन्न असलेल्या समान आकाराच्या गोलाकार वस्तूंची चित्रकार्डे आखून दिलेल्या वर्तुळात मांडणे.<br>४. रंग आणि मापे भिन्न असलेल्या समान आकाराच्या चौकोनी वस्तूंची चित्रकार्डे आखून दिलेल्या चौकोनात मांडणे.<br>५. मुलांनी घरून विविध वस्तू गोळा करून आणणे व वर्गात एकेक वस्तू हातात घरून त्यांचा आकार सांगणे. शिक्षकांनी आकार सांगण्यासाठी मुलांना मदत करणे.<br>६. लहान-मोठ्या आकारांवर बिया/खडे लावणे.<br>७. परिसरातील विविध आकारांविषयी संभाषण करणे. | कृतिपत्रिका, चित्रकार्डे, विविध वस्तू, आकारबंध, बिया |
| बालवाटिका २ | आकार | वर्गीकर | २. दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (उदा. आकार-रंग, रंग-माप) | १. शिक्षकांनी वस्तूंचे आकार, रंग व आकारमान यांविषयी प्रत्यक्ष वस्तू दाखवून मुलांशी चर्चा करणे.<br>२. मुलांनी प्रथम आकार व रंग या निकषांवर आधारित दिलेल्या वस्तूंचे वर्गीकरण करणे व नंतर वर्गीकरण केलेल्या गटाचे रंग व आकारमान या निकषावर वर्गीकरण करणे. | विविध वस्तू |
| बालवाटिका २ | आकार | वैशिष्ट्ये | ३. विविध घनाकृती/ आकार यांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे त्यांच्या स्वतः च्या भाषेत वर्णन करतो. (उदा. चेंडू घरंगळतो आणि त्याला कोपरे नसतात. खोका घसरतो त्याला कोपरे असतात.) | १. लांब पुठ्ठा किंवा लाकडाची फळी भिंतीला टेकवून घसरगुंडी तयार करणे. मुलांना विविध वस्तू घसरगुंडीवरून सोडायला सांगून गोलाकार वस्तूंचे 'घरंगळणे' आणि कोपरे असलेल्या वस्तूंचे 'घसरणे' यांचा अनुभव मुलांनी घेणे.<br>२. कोणत्या वस्तू घरंगळतात व कोणत्या घसरतात याविषयी प्रश्न विचारून मुलांना त्यांच्या भाषेत वस्तूंची वैशिष्ट्ये सांगण्यास प्रोत्साहन देणे. | पुठ्ठा, लाकडी फळी, विविध वस्तू |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | अवकाशीय समज | स्थानदर्शक शब्दांची समज | ४. स्थितीदर्शक शब्द समजून आकृतिबंध तयार करण्यासाठी आकार, रंग, स्थान यांचा वापर करून टप्प्याटप्प्याने दिलेल्या सूचनांचे पालन करतो. जसे की ठिपक्यांची रांगोळी काढणे, कोलाज बनविणे. त्यासाठी मध्यभागी, वर, खाली हे स्थानदर्शक शब्द समजून घेतो. | १. मुलांना एखादे चित्र दाखवून संभाषणाद्वारे वर, खाली, मध्यभागी, बाजूला, मागे, पुढे या सारख्या स्थानदर्शक शब्दांची ओळख करून देणे.<br>२. शिक्षकांनी टप्प्याटप्प्याने दिलेल्या विविध सूचनांच्या मदतीने मुलांनी आकृतिबंध तयार करणे.<br>उदा. १. चित्र रंगवणे.<br>२. कोलाजकाम करणे.<br>३. ठसेकाम करणे.<br>४. फुलांचा हार गुंफणे.<br>५. रांगोळी काढणे.<br>६. घडीकाम करणे.<br>७. वर्गसजावट करणे. | चित्र, रंग, कोलाजकामासाठी साहित्य, ठसेकामासाठी साहित्य, फुले, हार, रांगोळी, रुमाल, कागद |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.9 : लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व एकक निवडतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | मापन | लांबीचे मापन | १. लांबी– दोन वस्तूंच्या लांबीच्या संदर्भात तुलना करतो. ...च्यापेक्षा लहान, पेक्षा उंच, पेक्षा आखूड, पेक्षा लांब. | १. मुलांनी वर्गातील वस्तू व व्यक्ती यांचे निरीक्षण करून त्यांची लांबी, उंची व जाडीच्या संदर्भात एकमेकांशी तुलना करणे.<br>उदा. १. मुलांपेक्षा शिक्षक जास्त उंच.<br>२. पेन्सिलपेक्षा पट्टी जास्त लांब.<br>३. खेळण्यामध्ये घोड्यापेक्षा हत्ती जास्त जड.<br>२. मुलांनी स्वतःच्या शारीरिक अवयवांची तुलना करणे.<br>उदा. १. पायांच्या बोटांच्या लांबीपेक्षा हातांच्या बोटांची लांबी जास्त.<br>२. हातापेक्षा पायाची लांबी जास्त.<br>३. पोटापेक्षा हाताची जाडी कमी.<br>३. बागेतील झाडे, रोपटी, पाने, फुले, खेळाची साधने यांसंबंधी चर्चा करून त्यांची लांबी, रुंदी, उंची व जाडी यांची तुलना करणे. | वर्गातील वस्तू, व्यक्ती, बाग, झाडे, रोपटी, पाने, फुले, खेळाची साधने |
| बालवाटिका २ | मापन | वजनाचे माप | २. वजन : दोन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या संदर्भात करतो. जसे– च्यापेक्षा जड<br>च्यापेक्षा हलका | १. दोन भिन्न वस्तू दोन्ही हातात धरून मुलांनी त्यांच्या वजनाचा अनुभव घेणे व त्यांच्या वजनाची तुलना करणे.<br>उदा. १. द्राक्षापेक्षा पेरू जास्त जड आहे.<br>२. चेंडूपेक्षा खडू जास्त हलका आहे. | द्राक्ष, पेरू, चेंडू, खडू |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | मापन | आकारमानाचे मापन | ३. आकारमान : आकारमान संकल्पना कविता/ कथा यांच्याद्वारे व्यक्त करतो. | १. कथेच्या माध्यमातून परिसरातील वस्तूंच्या आकारमानाचे वर्णन ऐकणे व आकारमानाची संकल्पना जाणून घेणे.<br>२. आकारमान या संकल्पनेवर आधारित कृतियुक्त गाणी म्हणून आकारमान या संकल्पनेचा अनुभव घेणे.<br>३. आकारमानाचे वर्णन करताना चित्रांचा वापर करणे. | कथा, कृतियुक्त गाणी, चित्रे |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.10 : मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने, वेळेची मोजमापे या एककामध्ये कालमापन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कालमापन | वार, विशेष वार | १. विशेष दिवस ओळखतो जसे शनिवार, रविवार सुट्टीचा दिवस. (उदा. रविवारी सुट्टी आहे.) | १. वारांची गाणी म्हणणे.<br>२. सोमवारी शाळेत गप्पागोष्टी करताना रविवारी काय काय केले हे मुलांनी सांगणे.<br>३. शनिवार व रविवार का आवडतात, यावर बोलक्या बाहुल्यांचा संवाद. | गाणी, बोलक्या बाहुल्या |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.11 : १०० रुपयांपर्यंतचे साधे व्यवहार करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | नाणी, नोटा | नाणी व नाण्यांची तोंडओळख (१ ते ५) | १. भारतीय चलनातील नाणी ओळखतो. | १. १, २ व ५ची नाणी मुलांना प्रत्यक्ष दाखवणे.<br>२. दिलेल्या नाण्यांतील १, २, व ५ नाणी वेगळी करणे.<br>३. १, २ व ५ची नाणी घेऊन कागद आणि क्रेयॉनच्या सहाय्याने त्यांचे छाप काढणे.<br>४. नाण्यांचा संदर्भ असणारी गोष्ट सांगणे. | १, २ व ५ ची नाणी, कागद, क्रेयॉन, गोष्ट |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.12 : राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | गणितीय संप्रेषण | आकारनामे, संख्यानामे, सहसंबंध | १. संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून साध्या सूचनांचा अर्थ लावतो.<br>२. संख्यानामे आणि आकाराच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतो. | १. 'गणित अध्ययन कोपऱ्यात जाऊन एक चौकोन, दोन त्रिकोण आणि तीन वर्तुळे घेऊन ये', अशी मुलाला सूचना देणे.<br>२. मुलाने अर्थ समजून घेऊन सूचनेचे पालन करणे.<br>३. ठसेकाम करताना, संख्यानामे व आकारांच्या नावांचा उपयोग करून मुलांना साध्या सूचना देणे. (उदा. २ गोल ठसे काढ, त्यापुढे ३ चौकोनी ठसे काढ.)<br>४. संख्यानामे आणि आकाराच्या नावावर आधारित कृतिपत्रिकेत उपक्रम देणे. | चौकोन, त्रिकोण, वर्तुळे (चित्रकार्डे), ठसेकामाचे साहित्य, कृतिपत्रिका |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.
क्षमता : C-8.13 : राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे यांसंदर्भात सोपी गणिते सोडवतो व तयारही करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | गणितीय कोडी | भौमितिक आकार तयार करणे, भौमितिक आकाराचा वापर करून इतर परिचित आकृत्या तयार करणे. | १. टॅनग्रॅमचा वापर करून विशिष्ट आकृत्यांची रचना करतो. | १. टॅनग्रॅम (Tangram)चे विविध आकार मुलांना दाखवून त्यापासून एखादी आकृती तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे.<br>२. मुलांनी टॅनग्रॅम हाताळणे व त्यातील आकार ओळखणे.<br>३. मुलांना टॅनग्रॅमचे विविध आकार जोडून नवीन आकृती तयार करण्याची संधी देणे. उदा. पक्षी, गाडी, चांदणी, घर इत्यादी. | टॅनग्रॅम (Tangram) |

**विकास क्षेत्र : भाषा आणि साक्षरता विकास (प्राणमय व विज्ञानमय कोश विकास)**
ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.1 : साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | श्रवण, मौखिक भाषा | गाणी, बडबडगीते, कविता | १. घरात व परिसरात वारंवार ऐकली जाणारी विविध भाषांमधील गाणी ऐकतो आणि आनंद घेतो. | १. शिक्षकांनी स्वतः घरात व परिसरात म्हटली जाणारी व मुलांच्या भावविश्वाशी निगडित असलेली छोटी बडबडगीते म्हणून दाखवणे.<br>२. चित्रफित व ध्वनिफितींच्या साहाय्याने साधीसोपी बडबडगीते व परिसरातील पारंपरिक गाणी ऐकवणे.<br>३. वेगवेगळी बडबडगीते, गाणी, हावभाव, आवाजातील चढउतार, ताल व कृतीसह म्हणून दाखवणे.<br>४. ऐकलेली बडबडगीते व गाणी म्हणून मुलांनी आनंद घेणे. | विविध बडबडगीते, गाणी, उपलब्ध वाद्ये, चित्रफित, ध्वनिफित |
| बालवाटिका २ | श्रवण नाट्य | गाणी, बडबडगीते, अभिनय | २. हावभाव व आवाजातील चढउतारासह गाणी म्हणतो. | १. चित्रफिती, नाट्याभिनय, बोलक्या बाहुल्या, मुखवटे यांच्या माध्यमातून मुलांना गाणी व बडबडगीते ऐकण्याची संधी देणे.<br>२. गाणी व बडबडगीते कृतियुक्त हावभावासह शिक्षकांनी म्हणणे व मुलांना म्हणण्यासाठी प्रोत्साहन देणे.<br>३. मुलांना त्यांच्या कृतीयुक्त गाण्यांच्या चित्रफिती दाखवून प्रोत्साहन देणे. | चित्रफिती, बोलक्या बाहुल्या, मुखवटे, गाणी, बडबडगीते, मोबाईल |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.2 : स्वतःहून साधी गाणी आणि कविता तयार करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | श्रवण | यमकबद्ध ध्वनींची जाण | १. गाणी आणि कवितांमधल्या यमकबद्ध शब्दांचा आनंद घेतो. | १. यमकयुक्त गाणी आणि कविता मुलांना ऐकवणे.<br>२. डिजिटल साधने आणि ध्वनिफितींच्या सहाय्याने यमकयुक्त शब्द असलेली गाणी ऐकवून मुलांना यमकबद्ध शब्दांचा आनंद घेण्याची संधी देणे.<br>३. शिक्षकाने यमकबद्ध शब्दांवर जोर देऊन मुलांना गाणी म्हणून दाखवणे, जेणेकरून मुलांचे त्या शब्दांकडे लक्ष वेधले जाईल.<br>४. मुलांनी यमकबद्ध शब्द असलेली गाणी म्हणून शब्दांमधील नादाचा आनंद अनुभवणे. | यमकयुक्त गाणी, कविता, दृक्-श्राव्य साधने |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.3 : अस्खलितपणे आणि अर्थपूर्ण संभाषण करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | संभाषण कौशल्य | अस्खलित अर्थपूर्ण बोलणे | १. दैनंदिन जीवनातील विविध शालेय परिस्थितीमध्ये समवयस्क व शिक्षक यांच्यासोबत संभाषण सुरू करतो. | १. सर्व मुलांना संभाषणाची संधी मिळावी या दृष्टिकोनातून विविध भाषिक खेळांची रचना करणे.<br>२. गप्पागोष्टींच्या उपक्रमातून प्रत्येक मुलाला बोलते करणे.<br>३. चित्रवर्णन, चित्रगप्पा करताना मुलांना बोलण्यासाठी आणि प्रश्न विचारण्यासाठी प्रोत्साहन देणे.<br>४. शिक्षकाने मुलांशी भावनिक नाते निर्माण करून मुलांना आपल्या भावना व विचार व्यक्त करण्याची संधी देणे.<br>५. विविध प्रसंगी बोलण्यासाठी आवश्यक शब्दसंपत्तीवर आधारित बोलक्या बाहुल्यांचे संवाद ऐकवणे.<br>६. मुलांना विविध वस्तूंच्या माध्यमातून रंग, ध्वनी, चव, स्पर्श व आकारांचा अनुभव देणे व त्यांच्याशी गटनिहाय व स्वतंत्रपणे संभाषण करून त्यांना व्यक्त होण्याची संधी देणे. | भाषिक खेळ, चित्रे, बोलक्या बाहुल्या |
| बालवाटिका २ | संभाषण | अनुभव कथन, प्रश्न विचारणे | २. सोप्या वाक्यात रोजचे अनुभव कथन करतो आणि काय/ केव्हा/ कसे/ कोण इत्यादी शब्द वापरून साधे प्रश्न विचारतो. | १. काय? कोण? कसे? यावर आधारित भाषिक खेळ घेणे.<br>२. गप्पागोष्टी करताना मुलांनी घरून आणलेल्या कोणत्याही वस्तूबद्दल बोलणे.<br>३. परिसरातील घटना, प्रसंग, दैनंदिन जीवन यावर आधारित मुक्त प्रश्नोत्तराचा वापर करून मुलांच्या जिज्ञासेला व बोलण्याला प्रोत्साहन देणे. | वस्तू |

| ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.<br>क्षमता : C-9.4 : क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेतो व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **स्तर/ इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** |
| बालवाटिका २ | श्रवण | सूचनांचे आकलन अनुपालन | १. साध्या स्वरुपाच्या अनेक कृतींचा समावेश असलेल्या सूचनांचे पालन करतो. (एकाच वेळी २ ते ३ सूचना एकत्र दिल्यास) | १. खेळ व इतर उपक्रम घेताना शिक्षकांनी कमीत कमी शब्दांत व पूर्ण वाक्यात सूचना देणे विद्यार्थ्यांनी त्याप्रमाणे कृती करणे.<br>२. मुलांना एकाच वेळी २ ते ३ सूचना देऊन त्याप्रमाणे मुलांकडून कृती करून घेणे. उदा. टेबलावरील बाहुली घे. तिच्या गालावरून हात फिरव. ती बाहुली घरात नेऊन ठेव.<br>३. सूचनांचे योग्य पालन केल्यास टाळ्या किंवा प्रेरक कृती करणे.<br>४. शिस्त, स्वच्छता व आरोग्यदायी सवयीच्या संदर्भात शिक्षकांनी सूचना देणे व मुलांनी त्यांचे अनुपालन करणे. | बाहुली, इतर वस्तू |

| ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.<br>क्षमता : C-9.5 : कथन केलेल्या/ वाचलेल्या गोष्टी समजून घेतो आणि त्यातील पात्रे, गोष्टींची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे ते लक्षात घेतो. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **स्तर/ इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** |
| बालवाटिका २ | श्रवण अभिव्यक्ती | गोष्ट | १. गोष्टीतील पात्रे व काही प्रसंग आठवतो. ते स्वतःच्या भाषेत सांगतो. | १. चित्रे, मुखवटे, बोलक्या बाहुल्या, खेळणी वापरून शिक्षकांनी मुलांच्या अनुभवविश्वाशी जुळणाऱ्या गोष्टी सादर करणे.<br>२. आवाजातील चढउतार, शब्दांवरील जोर, हावभाव, कृती या सर्वांतून मुलांचे मन गोष्टीशी एकरूप करणे.<br>३. गोष्टीचे नाट्यीकरण करून मुलांना काही पात्रांच्या माध्यमातून गोष्टीत सहभागी करून घेणे.<br>४. मुलांनी गोष्टीतील पात्रांची नावे सांगणे.<br>५. गोष्टीतील प्रसंग मुलांनी आपल्या भाषेत कथन करणे. | गोष्टी, चित्रे, मुखवटे, बोलक्या बाहुल्या, खेळणी. |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.6 : स्पष्ट कथानकासह लघुकथा आणि पात्रे यांचे कथन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | -- | -- | या गटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | ---- | ---- |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.7 : दैनंदिन संवाद परिणामकारकरित्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करतो व आत्मसात केलेल्या शब्दसंग्रहाचा वापर करून नवीन शब्दांचा अर्थ लावतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | संभाषण | शब्द संग्रहाचा वापर | १. विशिष्ट प्रसंग किंवा वर्गामध्ये अभ्यासलेल्या विषयातून प्राप्त शब्दसंग्रहाचा उपयोग त्याच्या संभाषणात करतो. | १. गप्पागोष्टी, कथा, कविता, नाट्य, चर्चा, खेळ या उपक्रमातून मुलांचा शब्दसंग्रह विकसित करणे.<br>२. सण, उत्सव, खेळ, दैनंदिन जीवनातील प्रसंग या विषयावर औपचारिक व अनौपचारिक संभाषण करून मुलांना नवीन शब्दांचा परिचय करून देणे.<br>३. बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगावर आधारीत संभाषण ऐकवणे.<br>४. मुलांना संभाषण करण्याची संधी देण्यासाठी जाणीवपूर्वक संभाषण प्रसंगांची निर्मिती करणे. | कथा, कविता, नाट्य, खेळ, बोलक्या बाहुल्या. |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.1 : शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/ अक्षरे शब्दात गुंफतो आणि शब्दापासून शब्दध्वनी/ अक्षरे वेगळी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | श्रवण | यमक अनुप्रास रसग्रहण | १. यमक व अनुप्रास ओळखतो. | १. यमक व अनुप्रासयुक्त बडबडगीते व गाणी ऐकवणे.<br>२. यमक व अनुप्रासयुक्त शब्द नादयुक्त पद्धतीने म्हणून मुलांना शब्दसंगीताचा व नादाचा अनुभव देणे.<br>३. पुन्हा-पुन्हा म्हटलेली गाणी मुलांना म्हणायला लावून मुलांना यमक व अनुप्रासयुक्त शब्दांची ओळख करून देणे. | बडबडगीते, गाणी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | वाचन | वाचनपूर्व तयारी<br>ध्वनीची जाणीव<br>अक्षरे ओळखणे<br>ध्वनीचिन्ह संबंध | २. शब्दांतील प्रारंभिक आणि अंतिम अक्षरे ओळखतो. | १. शब्दांचा स्पष्ट व शुद्ध उच्चार करून पहिल्या व तिसऱ्या अक्षराच्या आवाजाकडे मुलांचे लक्ष वेधणे.<br>२. मुळाक्षर कार्ड दाखवून त्यांचा उच्चार करून आवाज व मुळाक्षर यांच्या सहसंबंधाची समज निर्माण करणे.<br>३. शिक्षकांनी शब्दाचे चित्रकार्ड दाखवणे. त्यातील अक्षरांचा सावकाश उच्चार करणे. मुलांनी त्या अक्षरांच्या संख्येएवढ्या उड्या मारणे.<br>४. मुलांनी आपली नजर खालीवर व डावीकडून उजवीकडे फिरविण्याचा सराव करणे.<br>५. अक्षरांच्या व शब्दांच्या जोड्या जुळवणे, पाहुणा ओळखणे, शब्दभेंड्या खेळणे यांसारख्या कृती करून घेणे. | शब्दकार्डे, मुळाक्षर कार्डे, कृतिपत्रिका |
| बालवाटिका २ | ध्वनीची जाण | वर्णमाला | ३. साधे शब्द तयार करण्यासाठी २-३ अक्षरध्वनी जोडतो. | १. मुलांना दोन अक्षरी लिखित शब्द दाखवणे व त्यांचा उच्चार करणे.<br>२. दोन अक्षरी शब्दसंग्रह घेऊन शब्द तोडण्याचा खेळ खेळणे. उदा.<br>[घ] [र]<br>या पद्धतीने आणखी काही शब्द तोडून दाखवणे व नंतर या पद्धतीने मुलांना शब्द तोडण्याची संधी देणे. दोन अक्षरी शब्दांचा सराव झाल्यानंतर तीन व चार अक्षरी शब्द घेऊन हीच कृती करणे.<br>३. शब्दातील स्वर व व्यंजने दाखविण्यासाठी शिक्षकांनी विविध शब्द ऐकवणे.<br>४. स्वर व व्यंजने यांची कार्डे वारंवार दाखवून त्यांची ओळख करून देणे.<br>५. शब्द तोडण्याच्या खेळात अक्षरकार्डांचा वापर करणे.<br>उदा. [पा] [न]<br>पा हे कार्ड आणि त्याचा आवाज यांचे साहचर्य लक्षात आणून देणे. अशा पद्धतीने अक्षरे आणि त्यांचा उच्चार यावर आधारित खेळ घेणे. | दोन अक्षरी शब्द, तीन अक्षरी शब्द, चार अक्षरी शब्द, अक्षरकार्डे |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.2 : पुस्तकाची मूलभूत रचना/मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखतो, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेतो व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | वाचन | वाचनपूर्व तयारी | १. पुस्तक पकडतो, उघडतो व चाळण्यासाठी पाने पालटतो. | १. मुलांचे लक्ष वेधून घेणारे मुक्त वाचनालय, वाचन कोपरा उपलब्ध करून देणे.<br>२. मोठी चित्रे असलेले व छोटा मजकूर असलेले आकर्षक साहित्य मुलांना हाताळण्यासाठी देणे.<br>३. पुस्तक हातात पकडणे, चाळणे इत्यादी कृती शिक्षकाने स्वतः करून दाखवणे व मुलांकडून करून घेणे.<br>४. मुलांनी पुस्तके हाताळून चित्रे पाहण्याचा आनंद घेणे.<br>५. छोटे-छोटे प्रश्न विचारून, तुला आवडलेले चित्र दाखव, तुला आवडलेले चित्र तुझ्या मित्र-मैत्रिणींना दाखव, यांसारख्या कृती करून घेणे.<br>६. पुस्तकाच्या मुखपृष्ठाविषयी चर्चा करणे.<br>७. पुस्तकाविषयीचे गाणे म्हणणे. | रंगीबेरंगी मुखपृष्ठे व चित्रे असलेली पुस्तके, गाणे, वर्तमानपत्राची रंगीत कात्रणे. |
| बालवाटिका २ | वाचन | चित्र वाचन | २. डावीकडून उजवीकडे आणि वरून खाली शब्दांचे अनुसरण करतो. | १. मुलांच्या भावविश्वातील गोष्टींची चित्रे, त्यांची नावे अशा चित्रनाम पट्ट्यांचे मार्गदर्शित वाचन करून घेणे.<br>२. वाचन करताना डावीकडून उजवीकडे आणि वरून खाली करावे हे वाचनपट्ट्या वाचताना समजावून देणे. | चित्रनामपट्ट्या |
| बालवाटिका २ | वाचन | मार्गदर्शित वाचन | ३. शब्द व ध्वनींचा योग्य रीतीने उच्चार करून वाचन करत असल्याचे दाखवतो. | १. चित्रशब्द कार्डांचा वापर करून वाचनाचा सराव करून घेणे.<br>२. मार्गदर्शित वाचन करणे.<br>३. एका दृष्टिक्षेपात वाचन करणे. (Sight words reading)<br>४. आपल्याला वाचता येते या मुलांच्या भावनेला प्रोत्साहन देणे.<br>५. अक्षरध्वनी आणि त्याचे मुखातील उगमस्तान यांची जाणीव करून देणाऱ्या उच्चारांसह वाचून दाखवणे. मुलांकडून तशाप्रकारे वाचून घेणे. | रंगीबेरंगी चित्रे असलेल्या मुखपृष्ठांची पुस्तके, नामपट्ट्या |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.3 : भाषा एक (L1)च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्दवाचन-लेखनासाठी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | वाचन लेखन | वाचनपूर्व व लेखनपूर्व तयारी | १. दृश्य स्वरुपात मुळाक्षरे आणि संबंधित ध्वनींची सांगड घालण्याची सुरुवात करतो. (मुळाक्षरे, चौदाखडी) | १. एकमेकात मिसळलेल्या मुळाक्षरातून मुखातील एकाच स्थानावरून उच्चार होणारी मुळाक्षरे शोधण्याच्या कृतीचे प्रात्यक्षिक दाखविणे.<br>२. मुळाक्षरांशी मुलांच्या परिचित कृतींची सांगड घालणे. उदा. स-ससा, यावेळी सशासारखी कानावर बोटे धरून उडी मारणे.<br>३. कृतीवरून कोणते मुळाक्षर ते ओळखण्याचा खेळ घेणे.<br>४. अक्षराचा ध्वनी आणि त्याचे मुखातील उगमस्थान यातील संबंध लक्षात आणून देणे.<br>५. अक्षर आणि त्यांचे शब्द यांवर आधारित गाणे म्हणणे. उदा. 'अ अ आई, म म मका'... | अक्षरांचे गाणे, चित्रपट्ट्या, अक्षरपट्ट्या, चित्रतक्ते, अक्षरतक्ते |
| बालवाटिका २ | वाचन | शब्दवाचन (दोन अक्षरी) | २. परिचित अक्षरांनी बनलेले दोन अक्षरी सोपे शब्द वाचतो. | १. मुलांना परिचित अक्षरांचे कार्ड दाखवून अक्षरे ओळखा हा खेळ घेणे.<br>२. दाखवलेल्या अक्षराचे मार्गदर्शित वाचन करून त्या अक्षरापासून दोन अक्षरी शब्द कसे तयार होतात, त्याचे योग्य उच्चार कसे करायचे, याचे प्रात्यक्षिक करून घेणे.<br>३. मुलांना परिचित असलेल्या मुळाक्षरांच्या कार्डाच्या सहाय्याने त्यांच्याकडून दोन अक्षरी शब्द तयार करून घेणे.<br>४. मुलांच्या वयोगटाला योग्य असे चित्रवाचन करून घेणे. | मुळाक्षरे कार्ड, शब्दकार्ड, चित्रकार्ड |
| बालवाटिका २ | शब्द परिचय | परिसरातील वस्तू | ३. परिसरात दिसणाऱ्या वस्तूंची लिहिलेली नावे, दृश्य शब्द (साईट वर्ड) म्हणून ओळखतो. | १. चित्रगप्पांच्या माध्यमातून परिसरातील सर्व वस्तूंच्या नावांची ओळख करून देणे.<br>२. परिसरातील वेगवेगळे घटक चित्रगप्पा, फलक लेखन आणि नामपट्ट्यांच्या माध्यमातून मुलांसमोर आणणे.<br>३. परिसरातील परिचित नावे वारंवार समोर आणून त्यावर आधारित शब्दकोडी, ओळखा पाहू, चला खेळूया असे उपक्रम घेणे. | चित्रकोडे, नामट्ट्या |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.4 : भाषा एक (L1) मधील कथा आणि परिच्छेद योग्य ठिकाणी विराम घेऊन आणि आवाजातील चढउतारासहित अचूकपणे व ओघवतेपणाने वाचतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | वाचन | वाक्य, वाचन | १. परिचित अक्षरे, ध्वनी आणि सहजगत्या दिसणाऱ्या शब्दांचा वापर करून लहान वाक्ये वाचतो. | १. मुलांना दैनंदिन वापरातील कृतींचे चित्रकार्ड दाखवणे.<br>२. कृतींच्या चित्रांशी संबंधित शब्दकार्ड मुलांना दाखवणे.<br>३. मुलांनी कृती चित्रकार्ड आणि शब्दकार्ड यांच्या जोड्या लावणे.<br>४. शब्दावरून चित्र ओळखणे व चित्रावरून शब्द ओळखण्याचा खेळ घेणे.<br>५. शब्दकार्डावरील परिचित झालेल्या शब्दांचा वापर करून मुलांना छोटी छोटी वाक्ये तयार करण्यास प्रोत्साहन देणे. उदा. खेळा- आत खेळा, बाहेर खेळा इ.<br>६. मुलांनी तयार केलेली वाक्ये फलकावर लिहून टाळ्या वाजवून त्यांचे कौतुक करणे.<br>७. लहान वाक्यांचे वाचन करणे. | कृती चित्रकार्ड, शब्दकार्ड |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.5 : स्वतःहून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | वाचन | सहभागी वाचन | १. शिक्षकांसोबत सहभागी वाचनात भाग घेतो आणि वाचलेल्या भागाविषयीच्या चर्चेत सहभागी होतो. | १. शिक्षकांनी आवाजातील चढउतार, योग्य हावभावासह गोष्टीचे सहभागी वाचन करणे.<br>२. पुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठाविषयी मुलांशी संभाषण करणे.<br>३. पुस्तकातील चित्रे, वाचलेली गोष्ट, पात्रे यांविषयी सूचक प्रश्न विचारून मुलांना बोलते करणे व मुलांच्या मनात वाचनाची गोडी निर्माण करणे. | रंगीत चित्रे, मोठी चित्रे व मजकूर असणारी पुस्तके |
| बालवाटिका २ | वाचन कथन | चित्रपुस्तक वाचन व कथन | २. चित्रपुस्तके वाचतो, त्यातील पात्रे, कथानक ओळखतो आणि घटनांचा योग्य क्रम लावून गोष्टी पुन्हा सांगतो. | १. मुलांनी रंगीत चित्रे आणि मजकूर असलेल्या पुस्तकांचे वाचन करणे.<br>२. गोष्टीतील पात्रे, प्रसंग, काय घडले, पुढे काय झाले यांसारखे प्रश्न विचारून घडलेल्या घटनांचा योग्य क्रम लावण्यासाठी शिक्षकांनी मुलांना मदत करणे.<br>३. मुलांनी घटनांचा योग्य क्रम लावून गोष्ट पुन्हा सांगणे. | रंगीत चित्रे व मजकूर असलेली गोष्टीची पुस्तके |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.6 : कवितेतील कल्पना व शब्दयोजना यांचे रसग्रहण करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | --- | --- | १. या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | --- | -- |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.7 : छोट्या बातम्या, सूचना, पाककृती आणि प्रकाशित साहित्य वाचतो आणि त्यातील अर्थाचे आकलन करून घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | --- | --- | १. या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | --- | -- |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.8 : स्वतःला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | लेखन | चित्रकला व लेखन साहित्याचा वापर | १. चित्रकलेचे अथवा लेखनाचे साहित्य सहजतेने वापरतो | १. मुलांना क्रेयॉन, खडू, पेन्सिल, ब्रश, रंग यांसारखे साहित्य देऊन चित्रकलेच्या व लेखनाच्या कृती करून घेणे.<br>२. मुले चित्रकलेचे व लेखनाचे साहित्य हातात कसे धरतात व त्यांना कसे हाताळतात याकडे शिक्षकाने विशेष लक्ष देणे व त्यांना योग्य मार्गदर्शन करणे.<br>३. साहित्य वापराचा मुलांकडून भरपूर सराव करून घेणे.<br>४. मुलांना छोट्या गटात विभागून पोस्टर्स तयार करून घेणे. | क्रेयॉन, खडू, ब्रश, रंग, पेन्सिल, कागद |
| | | | २. स्वलिपीत उभ्या-आडव्या रेषा, गोल, अर्धगोल, झिगझॅग रेषा यांचा वापर करून काढलेल्या चित्रांबद्दल लिहितो. चित्र व स्वलिपीतील लेखन वेगवेगळे दिसते. | १. मुलांना त्यांच्या भावविश्वातील मोठी व आकर्षक चित्रे, पुस्तके दाखविणे. त्यावर अनौपचारिक गप्पागोष्टी करणे व चित्रांविषयी मुलांना बोलते करणे.<br>२. मुलांना चित्राबद्दल स्वलिपीतून व्यक्त होण्यास प्रोत्साहन देणे. | मोठी व आकर्षक रंगीत चित्रे लेखन साहित्य. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | लेखन | लेखनपूर्व तयारी | ३. लेखनात पारंपरिक अक्षरे नसली तरीही लेखी भाषेची वैशिष्ट्ये दिसतात. जसे- स्वलिपीतील दोन शब्दांमध्ये अंतर सोडणे, स्वलिपीतील शब्दांवर शिरोरेषा देणे. | १. मुलांना त्यांच्या कल्पना, भावना, विचार स्वनिर्मित स्वलिपीत मांडण्यास सांगणे.<br>२. मुलांच्या स्वलिपीत मांडलेल्या कल्पना, भावना व विचार यांवर गप्पागोष्टी करून त्यांच्या लेखनाचा स्वीकार करणे व त्यांना प्रोत्साहन देणे.<br>३. मुलांनी स्वलिपीत लिहिलेल्या साहित्याचे शिक्षकांनी निरीक्षण करणे. त्यात भाषेच्या वैशिष्ट्यांपैकी दोन शब्दांतील अंतर, शिरोरेषा, शब्दांचा योग्य आकार आहे का हे पाहणे व त्याविषयी मुलांशी बोलणे. | कागद, लेखन साहित्य |
| बालवाटिका २ | अभिव्यक्ती | स्वलिपीतील मजकूर | ४. आपण स्वलिपीत लिहिलेला मजकूर तोंडी सांगतो. | १. मुलांनी स्वलिपीत लिहिलेल्या मजकुराचे शिक्षकांनी निरीक्षण करणे.<br>२. मुलांनी स्वलिपीत लिहिलेला मजकूर तोंडी सांगणे.<br>३. स्वलिपीतील मजकुराबाबत मुलांनी गटशः देवाण-घेवाण व गप्पागोष्टी करणे. | कागद, लेखन साहित्य |
| बालवाटिका २ | लेखन | स्व-ची अभिव्यक्ती | ५. स्वतःचे नाव लिहू शकतो. | १. कृतियुक्त खेळ घेऊन सहभागी विद्यार्थ्यांचे नाव शिक्षकांनी फलकावर लिहिणे व मोठ्या आवाजात वाचणे.<br>२. मुलांनी आपल्या नावाचे कार्ड शोधण्याचा खेळ घेणे.<br>३. मुलाने आपल्या नावाचे कार्ड वाचणे व लिहिणे. मुलांनी लिहिलेल्या नावाचा स्वीकार करणे. | कृतियुक्त खेळ, मुलांच्या नावाचे कार्ड |
| बालवाटिका २ | लेखन | अनु-लेखन | ६. शिकवलेल्या अक्षरांचा व अंकांचा स्वलिपीतील लेखनात अंतर्भाव दिसतो. मात्र ही अक्षरे लेखनात कुठेही, कशीही वापरलेली दिसतात. | १. मुलांना कार्डावरील त्यांचे नाव बघून लिहिण्यास सांगणे.<br>२. परिसरातील विविध प्राणी, पक्षी, फळे, फुले यांच्या नावाची कार्डे व अंककार्डे मुलांना दाखवून ती लिहिण्यास सांगणे.<br>३. मुलांनी स्वलिपीत लिहिलेल्या अक्षरांचा व अंकांचा स्वीकार करणे. | मुलांची नावे, प्राणी, पक्षी, फळे, फुले यांच्या नावाची कार्डे |
| बालवाटिका २ | लेखन | अक्षर ओळख व लेखन | ७. परिचित अक्षरे लिहिण्यास सुरुवात करतो व त्याचा वापर सोपे शब्द तयार करण्यासाठी करतो. | १. भाषिक खेळांच्या माध्यमातून मुलांना परिचित शब्दांचे लेखन करण्यास सांगणे.<br>२. मुलांनी चित्रकार्ड पाहून संबंधित शब्द व चित्र याबाबत गप्पागोष्टी करणे. त्यानंतर चित्रकार्डावरून शब्द लिहून घेणे.<br>३. मुलांनी लिहिलेल्या शब्दलेखनाचे कौतुक करणे. | भाषिक खेळ, चित्रकार्डांचा संग्रह |
| बालवाटिका २ | चित्रकला | रेखाचित्रे, रंगकाम, अभिव्यक्ती | ८. दृश्य आकार आणि वस्तू अचूकपणे रेखाटतो व रंगवतो आणि रेखाटलेल्या चित्राचे तोंडी वर्णन करतो. | १. मुलांना त्यांच्या आवडीची चित्रे काढण्याची संधी देणे.<br>२. त्यांच्या परिचयाचा एखादा विशिष्ट विषय देऊन चित्रे काढण्यास सांगणे. (उदा. घर, शाळा, बाग इत्यादी)<br>३. गप्पागोष्टी करून मुलांना त्यांच्या चित्रांबद्दल व्यक्त होण्याची संधी देणे. | कागद, चित्रकलेचे साहित्य |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.9 : बालकांसाठी असलेली विविध पुस्तके वाचण्यात रुची दर्शवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | वाचन | पुस्तकाची निवड | १. शिक्षकांनी समोर ठेवलेल्या अनेक पुस्तकांतून एका पुस्तकाची निवड करतो व विशिष्ट पुस्तक निवडीबद्दल स्पष्टीकरण देतो. | १. मुलांना बालगीत, बडबडगीत, गोष्टी, बोधकथा, संस्कृती निगडित कथा, अशी बालसाहित्यातील विविध चित्रमय पुस्तके हाताळण्यास देणे.<br>२. मुले कोणती पुस्तके हाताळतात, कोणत्या पुस्तकाबाबत त्यांना रुची आहे याचे शिक्षकांनी निरीक्षण करणे.<br>३. मुलांनी निवडलेल्या पुस्तकांविषयी त्यांच्याशी चर्चा करणे व निवडलेल्या पुस्तकाबद्दल त्याचे विचार जाणून घेणे.<br>४. मुलांनी ऐकलेल्या व चित्रांद्वारे वाचलेल्या पुस्तकातील गोष्टी, गाणी सांगण्याची त्यांना संधी देणे. | विविध चित्रमय पुस्तके |
| बालवाटिका २ | सामाजिक विकास | पुस्तके जागेवर ठेवणे | २. पुस्तके वर्गातील नियोजित जागेवर परत ठेवतो. | १. मुलांना आकर्षित करेल असे वाचनालय व पुस्तके ठेवण्याची जागा उपलब्ध करणे.<br>२. पुस्तक हाताळून झाल्यावर ते व्यवस्थित जागेवर ठेवण्यासाठी मुलांना मार्गदर्शन करणे.<br>३. मुलांना पुस्तक जागेवर ठेवल्यावर त्याचे कौतुक करणे. | वाचनालय, पुस्तके ठेवण्याची जागा |

ध्येय : CG-11 : मुले भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.
क्षमता : C-11.1 : शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/ अक्षरे एकत्र करून शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/ अक्षरे वेगळी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | -- | -- | १. या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | -- | -- |

ध्येय : CG-11 : मुले भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.
क्षमता : C-11.2 : लिपीतील वारंवार येणारी अक्षरे ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | -- | -- | १. या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | -- | -- |

**विकासक्षेत्र : सौंदर्यात्मक आणि सांस्कृतिक विकास (आनंदमय कोश विकास)**

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

क्षमता : C-12.1 : विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | दृश्यकला | साधनांचा वापर | १. साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदा. काड्या, बिया, खडे, दगड, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री इत्यादी) | १. कलासाहित्याच्या साधनांवर योग्यरित्या पकड येण्यासाठी मुलांना मार्गदर्शन करणे व त्यांच्याकडून सराव करून घेणे.<br>उदा. रांगोळी हाताळणे, प्रारंभी एक रिकामा खोका देऊन पाच बोटांनी खोक्यात रांगोळी सोडणे नंतर चार बोटांनी, नंतर तीन व नंतर दोन बोटांनी.<br>२. काड्या, बिया, खडे, दगड, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री ही साधने हाताळण्यासाठी शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन करून मुलांकडून सराव करून घेणे. | रांगोळी, खोका, काड्या, बिया, खडे, दगड, दोरा, पेन्सिल, ब्रश, भुकटी, कात्री |
| बालवाटिका २ | दृश्यकला | चित्रकला मण्यांचे आकार खडूंनी काढलेले आकार | २. समवयस्क, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या सहयोगाने, मोठ्या स्वरुपाची कामे करतो. | १. गटशः कलाकृती तयार करणे.<br>उदा. १. भित्तीचित्रे काढणे व मुक्तपणे रंगवणे.<br>२. खडूच्या सहाय्याने रेघोट्या मारून विविध आकार तयार करणे.<br>३. मण्यांचा वापर करून जमिनीवर विविध आकार बनविणे.<br>४. काड्यांचा वापर करून जमिनीवर विविध आकार बनविणे.<br>५. सहकाऱ्याच्या मदतीने हाताच्या बोटांचे ठसे उमटवून चित्र तयार करणे.<br>६. वाळूत आकृती तयार करणे. | खडू, रंग, मणी, काड्या, वाळू |
| बालवाटिका २ | दृश्यकला | मातीकाम | ३. माती किंवा कणिक यांसारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय (3D) आकार तयार करतो. | १. माती कुटणे, चाळणे, भिजवणे, पीठ मळणे, छोटे-मोठे गोळे करणे, थापणे अशा कृती मुलांकडून करून घेणे.<br>२. मातीचे गोळे व पिठाचे गोळे देऊन मुलांनी त्यांच्या कल्पनेप्रमाणे त्यांना आकार देणे. | माती, पीठ |
| बालवाटिका २ | दृश्यकला | ठसेकाम (मुद्राचित्रण) | ४. ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो. | १. परिसरातील पाने, फुले, फळे, लाकडी तुकडे, स्टेन्सिल्स यांसारख्या वस्तू मुलांना गोळा करून आणण्यास सांगणे.<br>२. गोळा केलेल्या साहित्याचा उपयोग करून वर्तमानपत्र किंवा कागदावर रंगाच्या सहाय्याने मुलांनी ठशेकाम करणे. | ठसेकामाचे साहित्य, कागद, रंग |

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
क्षमता : C-12.2 : संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा, विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | संगीत | तालबद्धता, लय | १. स्वतःचा आवाज, शरीर, वाद्ये व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना द्रुत आणि संथ लय यांच्यात फरक करतो. | १. द्रुत व संथ लयीतील गाणी म्हणणे.<br>२. द्रुत व संथ लयीतील गाणी म्हणताना टाळ्या वाजवून मुलांना लयीचा अनुभव देणे.<br>३. हात आणि पायाच्या कृतींचा वापर करून एकच गाणे आधी संथ लयीत व नंतर द्रुत लयीत म्हणणे.<br>४. वाटी, पेला, चमचा, डबा, काठी यासारख्या वस्तू आणि घुमट, टाळ, खंजिरी या सारख्या लोकवाद्यांचा वापर करून द्रुत व संथ लयीचा अनुभव घेणे.<br>५. संथ व द्रुत लयीत लोकगीत गाऊन मुलांनी त्यावर नृत्य करणे. | गाणी, वाटी, पेला, चमचा, डबा, काठी, घुमट, टाळ, खंजिरी, लोकगीत |
| बालवाटिका २ | आवाजाची निर्मिती | विविध प्रकारचे ध्वनी | २. आवाज, शरीर किंवा साधने यांचा वापर करून संदर्भ/ परिस्थितीनुसार विविध ध्वनी निर्माण करतो. (भूमिका, अभिनय, एकल किंवा समूहामध्ये संगीतमय व्यवस्थित रचना, नकला यांमध्ये) | १. विविध प्राण्यांचे व पक्ष्यांचे आवाज काढणे व त्यांची नक्कल करणे.<br>२. गाणे म्हणताना साथ देण्यासाठी टाळ्या वाजवणे.<br>३. पेनचे टोपण, कागदाची सुरळी यांसारख्या वस्तूंमध्ये फुंकर मारून ध्वनी निर्माण करणे.<br>४. ओठ व जीभ यांचा वापर करून वाहने, घोडागाडी, हॉर्न यांचे आवाज काढणे. | पेनचे टोपण, कागद |
| बालवाटिका २ | आवाज | वर्गीकरण, तीव्रता, मृदुता | ३. आवाज, शरीर, वस्तू यांचा वापर करताना किंवा साधनांबरोबर खेळताना आवाजाची मात्रा (लहान आणि मोठा) आवाजाची पट्टी (तीव्र आणि मृदू) यांच्याबरोबर प्रयोग करतो. | १. आपले नाव दुसऱ्या मुलाच्या कानात हळुवार कुजबुज करून सांगणे व नंतर मोठ्याने सांगणे.<br>२. मृदु आवाजातील प्रार्थनेची ओळ आणि तीव्र आवाजातील घोषणा यांचा अनुभव देणे.<br>३. झांज, ढोलक यांसारख्या वाद्यांचे मृदू आणि तीव्र आवाज ऐकवणे.<br>४. मृदू आणि तीव्र आवाजात टाळ्या वाजवणे. | प्रार्थना, घोषणा, झांज, ढोलक, इतर वाद्ये, मोबाईल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कला | शांतता, स्थिरता | ४. संगीत, नाट्य आणि हालचाली यांच्या सहाय्याने शांतता आणि निःशब्दता यांच्या बाबतीत प्रयोग करतो. | १. निसर्गाचे सुंदर चित्र दाखवताना मोबाईलवरून बासरीची शांत धून ऐकवणे.<br>२. मुलांनी मांडी घालून, डोळे मिटून बसणे आणि श्वासाचा आवाज ऐकणे.<br>३. डोळे मिटून दीर्घ ओम्कार म्हणणे.<br>४. प्रार्थना म्हणणे.<br>५. गोष्ट सांगताना एखाद्या व्यक्तीचे, प्रसंगाचे वर्णन करून मुलांना शांततेचा अनुभव देणे.<br>६. 'पुतळा' हा खेळ खेळणे. (संगीताची धून वाजताना गोलाकार चालणे व धून थांबताच एखाद्या विशिष्ट स्थितीत स्थिर उभे राहणे)<br>७. संवाद न म्हणता हालचाल व अभिनयातून प्रसंग सादर करणे. | चित्र, बासरीची धून, प्रार्थना, गोष्ट, खेळ, मोबाइल. |

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
क्षमता : C-12.3 : कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता आणि कल्पकतेचा उपयोग करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कला | सर्जनशीलता | १. कलेबाबतच्या स्वतःच्या कल्पना, साधने आणि पद्धती इतरांना सांगतो आणि परिचित उदाहरणांच्या मदतीने त्यांचे उत्स्फूर्त सादरीकरण करतो. | १. संगीताची धून वाजताना स्वतःच्या कल्पनेने कृती व हालचाली करून नृत्य करणे.<br>२. दिलेल्या आकृतीत स्वतःच्या कल्पनेने क्रेयॉन रंग भरणे.<br>३. खडूने मुक्त रेखाचित्रे रेखाटणे.<br>४. वस्तूंचा वापर वेगळ्या प्रकारे करण्याचा अभिनय करतो. (उदा. पेन्सिलला ब्रश मानून दात घासण्याचा अभिनय, छोट्या पट्टीला कंगवा मानून केस विंचरण्याचा अभिनय) | मोबाइल, क्रेयॉन, कागद, खडू, पेन्सिल, इतर वस्तू. |
| बालवाटिका २ | नाट्य | अभिनय | २. दृक् आणि ललित कलांच्या माध्यमातून व्यक्ती, प्राणी, वनस्पती, वस्तू इत्यादींच्या ओळखता येण्याजोग्या शारीरिक आणि वर्तन वैशिष्ट्यांची नक्कल करतो. | १. विविध व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची चित्रफित दाखवून त्यांची नक्कल करण्यास सांगणे. (उदा. डॉक्टर, ट्रॅफिक पोलीस, बस कंडक्टर, भाजी विक्रेती इ.)<br>२. गोष्टीत किंवा नाट्यकृतीत प्राणी, वनस्पती, फळे, फुले, वस्तू यांच्या भूमिका करणे. | चित्रफित, गोष्ट, नाट्य |

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
क्षमता : C-12.4 : कलामाध्यमामध्ये सहयोगाने काम करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कला | सामूहिक निर्मिती व सादरीकरण | १. समवयस्कांच्या साहाय्याने विविध संभाषण, हालचाली, ध्वनी आणि दृष्टकलेचे नमुने तयार करतो. | १. गटशः किंवा जोडीदाराच्या बरोबर गोष्टीतील प्रसंग/ दैनंदिन जीवनातील परिचयाचा प्रसंग सादर करणे.<br>२. गटशः रांगोळी काढणे, कोलाजकाम करणे.<br>३. जोडीदाराबरोबर गाणे/ नृत्य सादर करणे. | गोष्ट, रांगोळी, कोलाजकामासाठी आवश्यक वस्तू, ठसेकामासाठी आवश्यक वस्तू, गाणे, नृत्य. |

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
क्षमता : C-12.5 : विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | कला | आकलन संवाद | १. कलाकृती किंवा स्थानिक सांस्कृतिक अभिव्यक्ती यांच्या विविध पैलूंबाबत संवाद साधतो. (उदा. एखाद्या पात्राचा मोठा आणि थरथरणारा आवाज) | १. एखादी चित्रफित, नाटिका पाहताना त्यातील पात्रांच्या ठळक वैशिष्ट्यांबद्दल इतरांना सांगतो.<br>२. परिसरातील ऐतिहासिक अथवा सांस्कृतिक स्थळ पाहिल्यानंतर प्रतिक्रिया व्यक्त करणे.<br>३. आवडलेले चित्र, शिल्प आणि इतर कलाकृती यांबद्दल इतरांशी बोलणे. | चित्रफित, नाटिका, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे, चित्रे, शिल्प इतर कलाकृती. |
| बालवाटिका २ | कला निर्मिती | कल्पना, संवाद, सादरीकरण | २. कलेच्या प्रक्रियेदरम्यान समवयस्कांसोबत प्रतिसाद व कल्पनेची देवाणघेवाण करतो. | १. कागदाचे घडीकाम, ठसेकाम, कोलाज यांसारख्या कलात्मक कृती एकत्र करताना आपल्या कल्पना व इतरांच्या कल्पना यांची देवाण-घेवाण करून त्यासंबंधी इतरांबरोबर चर्चा करण्याची संधी देणे.<br>२. इतरांबरोबर नाट्य, नृत्य, वेशभूषा सादरीकरणात सहभागी होताना सादरीकरणासंबंधी चर्चा करणे व कल्पनांची देवाण-घेवाण करणे. | घडीकाम, ठसेकाम व कोलाज कामासाठी आवश्यक वस्तू, नाट्य, नृत्य, वेशभूषा सादरीकरण |

**विकास क्षेत्र : सकारात्मक अध्ययन सवयी**

ध्येय : CG-13 : मुले अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. त्यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

क्षमता : C-13.1 : अवधान आणि हेतुपुरस्सर कृती : विशिष्ट ध्येय प्राप्तीसाठी नियोजन, अवधान केंद्रीकरण मार्गदर्शित कृती करणे, अशी कौशल्ये संपादित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | एकाग्रता, अवधान | १. प्रौढांच्या मदतीत सुरू असणाऱ्या प्रकटवाचन, कथाकथन यांसारख्या कृतींमध्ये काही काळासाठी लक्ष विचलित न होता एकाग्र होतो. | १. आवाजातील चढउतार आणि अभिनयासहित प्रभावी पद्धतीने गोष्टी सांगून मुलांना अवधानपूर्वक व एकाग्रतेने ऐकण्याची सवय लावणे.<br>२. मुलांनी एकाग्रतेने वाचनात सहभागी व्हावे यासाठी योग्य ठिकाणी शब्दांवर दिला जाणारा जोर आणि आवाजातील चढउताराचा वापर करून मुलांना वाचनाचा आनंद देणे.<br>४. मुलांना आवडतील अशा चित्रफिती, बाहुलीनाट्य, नाटिका पाहण्याची संधी देणे. | गोष्टी, चित्रफिती, बोलवाक्यबाहुल्या, नाटिका |
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | एकाग्रता | २. आवडणाऱ्या विविध कृती करत राहतो. (नाट्यात्मक खेळ आणि ठोकळे ठेवलेल्या ठिकाणी १० मिनिटांसाठी खेळतो.) | १. मुलांना आवडणाऱ्या अध्ययन कोपऱ्यात १० मिनीटांसाठी खेळण्याची संधी देणे. (उदा. ठोकळ्यांची रचना, चित्रपुस्तके, बाहुल्या, रंगकाम, ठसेकाम, मातीकाम इत्यादी.) | ठोकळे, बाहुल्या, चित्रपुस्तके, रंग, माती, ठसेकामासाठी आवश्यक वस्तू. |

ध्येय : CG-13 : मुले अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. त्यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

क्षमता : C-13.2 : स्मृती आणि मानसिक लवचिकता : संरचित वातावरणामध्ये अध्ययन सुलभ होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता (योग्य प्रकारे अवधान केंद्रित होणे किंवा बदलणे) स्वयंनियंत्रण (आवेगात्मक कृती किंवा प्रतिसाद रोखणे) विकसित करणे.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | स्मृती | १. स्वतःला आवश्यक असणारे प्रसाधन साहित्य किंवा खेळणी यांची यादी म्हणून दाखवतो. | १. प्रसाधन साहित्यावर आधारित बोलक्या बाहुल्यांचा मनोरंजक संवाद ऐकवणे.<br>२. गप्पागोष्टींच्या माध्यमातून मुलांना त्यांच्या प्रसाधन साहित्याविषयी बोलण्याची संधी देणे.<br>३. खेळांविषयी चर्चा करताना मुलांनी खेळासाठी आवश्यक साहित्य आणि विविध खेळण्यांची नावे सांगणे. | बोलक्या बाहुल्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | स्मृती | २. स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा. यासारखे सोपे खेळ खेळतो. | १. मुलांनी आधीच्या दिवशी घरी काय केले, कोणता मनोरंजक प्रसंग घडला, घराबाहेर कुठे गेलो, काय केले यांविषयी बोलणे.<br>२. टेबलावर काही वस्तू ठेवून त्या अगदी थोड्या कालावधीसाठी दाखवून कपड्याने झाकणे. नंतर मुलांनी पाहिलेल्या जास्तीत जास्त वस्तूंची नावे सांगण्याचा प्रयत्न करणे.<br>३. समान रंग व आकाराच्या वस्तूंच्या जोड्या लावणे. (उदा. चेंडू, बाहुली, ठोकळे, पाने, फुले इत्यादी) | टेबल, विविध वस्तू, चेंडू, बाहुली, ठोकळे, पाने, फुले यांसारख्या वस्तू. |
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | स्मृती, सूचना पाळणे | ३. सोपी कामे करण्यासाठी दोन टप्प्यांच्या सूचना लक्षात ठेवतो आणि पाळतो. (उदा. हात धू आणि नंतर खाऊ करायला मदत कर) | १. मुलांना कमीत कमी शब्दात दोन टप्प्यांच्या सूचना देणे. मुलांनी त्याप्रमाणे कृती केल्यानंतर त्यांचे कौतुक करून प्रोत्साहन देणे. (उदा. चेंडू आण आणि टेबलावर ठेव, फेल घे आणि मित्राला दे.) | चेंडू, फूल, टेबल |
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | स्मृती | ४ गोष्ट आणि गाणी यामधल्या कृती लक्षात ठेवतो. | १. गोष्टी आणि गाणी म्हणताना अर्थाला पूरक अभिनय आणि कृती मुलांना करून दाखवणे.<br>२. मुलांनी गोष्टी आणि गाणी म्हणताना अभिनय आणि कृती करणे. | गोष्टी, गाणी |
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | प्रयत्न, समस्या, निराकरण, कौशल्ये | ५. एखादी गोष्ट पहिल्यांदा करता न आल्यास प्रौढ व्यक्तीच्या मदतीने दुसरा मार्ग स्वीकारून 'बोधात्मक लवचिकता' दर्शवतात. (उदा. पहिल्या प्रयत्नांमध्ये उंचावर चढणे शक्य न झाल्यास दुसरा मार्ग वापरतो किंवा साधनांच्या किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या मदतीने त्या वस्तूपर्यंत पोहोचतो. | १. ठोकळ्यांचा मनोरा रचण्यास सांगणे. मनोरा कोसळत असल्यास मुलांशी चर्चा करून उपाय शोधणे.<br>२. कपाटाखाली अडकलेली वस्तू बॅटने किंवा काठीने काढणे.<br>३. दोरीवरील कपडा काठीने अथवा खुर्चीवर उभे राहून काढणे.<br>४. कपाटावरील चेंडू काढण्यासाठी स्टूल, टेबल किंवा खुर्ची यांचा वापर करणे.<br>५. वस्तू घेण्यासाठी प्रौढ व्यक्तीचे सहकार्य घेणे. | ठोकळे, बॅट, काठी, कपडा, चेंडू, कपाट, स्टूल, खुर्ची, टेबल |
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | अवधानात आवश्यक तेव्हा बदल करणे. | ६. आवश्यकतेनुसार अवधान एका कामावरून किंवा कृतीवरून दुसरीकडे वळवू शकण्याची क्षमता दर्शवतो. | १. एकीकडून दुसरीकडे अवधान वळविण्याची क्षमता निर्माण होण्यासाठी मुलांना योग्य पद्धतीने क्रमशः विविध अध्ययन अनुभव देणे.<br>उदा. कागदाच्या घडीकामानंतर चित्र वाचन, गोष्टीनंतर गाणे इत्यादी. | कागद, चित्रपुस्तक, गोष्ट, गाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | वर्तन, समस्या व उपाययोजना | ७. समवयस्कांचे वर्तन किंवा त्यांच्या बरोबरच्या आंतरक्रियांमुळे त्रास होत असल्यास प्रौढ व्यक्तींची मदत घेतो. | १. समवयस्कांचे बोलणे आणि त्यांचे वर्तन यामुळे मुलांना होणारा त्रास, प्रौढ व्यक्तींच्या मदतीमुळे कसा संपतो याविषयी बोलक्या बाहुल्यांचे नाट्य सादर करणे.<br>२. मुलांशी व्यक्तिगत संभाषण करून त्यांच्या समस्या जाणून घेणे.<br>३. समवयस्क मुलांच्या वर्तनाचा त्रास होणाऱ्या मुलांनी प्रौढांची मदत घेणे आवश्यक आहे हा विचार समजून घ्यावा यासाठी मुलांना घटना, प्रसंग व गोष्टी सांगणे. | बोलक्या बाहुल्या, गोष्टी |
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | समस्या व उपाययोजना | ८. समवयस्कांमुळे होणारा त्रास, काही शब्द, खुणा किंवा हावभावाच्या माध्यमातून प्रौढ व्यक्तींच्या मदतीने व्यक्त करतो. (चावणे किंवा ढकलण्याऐवजी) | १. समवयस्क मुलांच्या वर्तनामुळे होणारा त्रास आणि त्यावर उपाय याविषयी मुलांशी संभाषण करणे.<br>२. समवयस्क मुलांनी त्रास दिल्यास प्रौढांच्या मदतीने शब्द, खुणा आणि हावभावाच्या माध्यमातून तो व्यक्त करावा. चावणे, ढकलणे या सारख्या कृती करू नयेत हा विचार मुलांना गप्पागोष्टीतून समजावून सांगणे. | |
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | आवेगात्मक वर्तनावर नियंत्रण | ९. प्रौढ व्यक्तींच्या मदतीने आवेगात्मक वर्तनाचे सनियंत्रण करतो. (शिक्षकांनी आठवण करून दिल्यावर गोष्ट सांगताना प्रश्न विचारल्यावर लगेच उत्तर देण्याची इच्छा राखतो.) | १. मुलांना त्यांच्या आवेगात्मक वर्तनाची वेळोवेळी जाणीव करून देणे.<br>२. सनियंत्रित वर्तनावर आधारित बोलक्या बाहुल्यांचा संवाद सादर करणे.<br>३. सनियंत्रित वर्तनाविषयी मुलांशी संभाषण करणे. | बोलक्या बाहुल्या |

ध्येय : CG-13 : मुले अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. त्यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.
क्षमता : C-13.3 : निरीक्षण, आश्चर्य, कुतुहल आणि शोध : वस्तूंच्या सूक्ष्म बारकाव्यांचे निरीक्षण करतो, विविध ज्ञानेंद्रियांचा वापर करून शोध घेतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | कुतुहल | १. नैसर्गिक वातावरणामध्ये कुतुहल आणि विस्मय दाखवतो. | १. मुलांना निसर्गभ्रमणासाठी नेऊन मुक्तपणे फिरण्याची व खेळण्याची संधी देणे.<br>२. निसर्गभ्रमण करताना मुलांशी निसर्गातील विविध झाडे, प्राणी, पक्षी, फुलपाखरे, आकाश, ढग, पाणी यांविषयी गप्पागोष्टी करणे.<br>३. बागेतील पाने, फुले, खडे, पक्ष्यांची पिसे, खडे यांसारख्या वस्तू गोळा करण्यास सांगणे.<br>४. मुलांच्या मनात निसर्गाविषयीचे कुतुहल आणि विस्मय निर्माण करणारी चित्रफित दाखविणे. | झाडे, प्राणी, पक्षी, फुलपाखरे, आकाश, ढग, पाणी, पाने, फुले, खडे, पिसे यांसारख्या वस्तू, चित्रफित. |
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | शोधवृत्ती, कुतुहल | २. प्रौढ व्यक्तींच्या मदतीने किंवा मदतीशिवाय सभोवतालच्या परिसराचा शोध घेण्यासाठी कुतुहल दर्शवतो. | १. पक्ष्यांचे घरटे दाखवून त्याची माहिती देणे.<br>२. फुलपाखरांचे निरीक्षण करणे.<br>३. पक्ष्यांचे आवाज ऐकणे.<br>४. ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना भेट देणे.<br>५. दुर्बिणीने दूरच्या वस्तू पाहणे. | घरटे, फुलपाखरे, पक्षी, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे, प्रार्थनालय, दुर्बिण |

ध्येय : CG-13 : मुले अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. त्यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.
क्षमता : C-13.4 : वर्गखोली नियामके : नियामके समजपूर्वक स्वीकारतो आणि पालन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका २ | सकारात्मक सवयी | नियमपालन | १. शिक्षकांनी दिलेल्या संकेतानुसार वर्गातील नियम पाळतो. | १. चप्पल/ बूट योग्य जागेवर ठेवणे.<br>२. मैदानावर किंवा सभागृहात रांगेत जाणे.<br>३. अध्ययन कोपऱ्यातील वापरलेले साहित्य योग्य जागी ठेवणे.<br>४. क्रियाकलाप करताना पडलेला कचरा उचलून कचरापेटीत टाकणे. | कचरापेटी |

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, पर्वरी–गोवा